


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर




वर्ष २९ वे | अंक २१८ | पाने ६ | गुरुवार | दि. १८ सप्टेंबर २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

## चारित्र्याच्या संशयावरून कटगुण येथे

# पतीने केला पत्नीचा खून

**पुसेगाव/प्रतिनिधी:–**

कटगुण तालुका खटाव येथील गोसावी वस्ती येथे पतीने पत्नीच्या डोक्यात चारित्र्याच्या संशयावरून लोखंडी रॉड मारून खून केल्याचा प्रकार समोर आला आहे .ही घटना बुधवार दिनांक १७ रोजी दुपारी एकच्या दरम्यान घडली .घटनेनंतर पती विनोद विजय जाधव वय २६ स्वतःहून पुसेगाव पोलीस ठाण्यात हजर झाला आहे.

पिंकी विनोद जाधव वय २१ राहणार कट गुण गोसावी वस्ती तालुका खटाव असे मयत पत्नीचे नाव आहे .पुसेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमण व पुसेगाव पोलीस स्टेशन चा स्टाफ पतीच्या कबुली जबाबानंतर थेट घटनास्थळी पोहोचला तेव्हा मयत पिंकी जाधव रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली तत्काळ त्या ठिकाणी पोलिसांनी तिला उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र पुसेगाव या ठिकाणी आणले परंतु ती उपचारापूर्वीच मयत झाली होती . विजय जाधव याने पत्नीवर चारित्र्याचा संशय घेऊन तिच्या डोक्यात लोखंडी गजाने प्रहार केला हा फटका जिव्हारी लागल्याने तिचा जागीच



मृत्यू झाला पिंकी जाधव हिला तीन चिमुकली मुले आहेत सदर घटनेमुळे कटगुण व पुसेगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे . सदर घटनेबाबत पुसेगाव पोलीस स्टेशनला आरोपी पती विनोद जाधव यांच्या विरोधात सदोष मनुष्य पदाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुसेगाव पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक तुषार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमण अधिक तपास करत आहेत.

# मिनाताई ठाकरेंच्या पुतळ्यावर रंग टाकणाऱ्याला अटक

**मुंबई/प्रतिनिधी:–**

शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी स्व. मीनाताई ठाकरे यांच्या दादरच्या शिवाजी पार्क येथील पुतळ्यावर लाल रंग टाकल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. विशेष म्हणजे आरोपी हा ठाकरेंच्या कार्यकर्त्याचा चुलत भाऊ असल्याची माहिती प्राथमिक तपासातून पुढे आलीय. उपेंद्र गुणाजी पावसकर असे आरोपीचे नाव असून गुन्हा केल्याचे त्याने कबूल केल्याची सूत्रांची माहिती



आहे. दरम्यान, मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्याजवळ लाल रंग टाकून विटंबना करण्याचा प्रयत्न

पान ६ वर

# शिक्षण-तंत्रज्ञानातूनच भारताचे भविष्य उज्ज्वल

## डॉ.बाबासाहेब कल्याणी ;महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव ;पी.डी.पाटील यांचे कार्य आदर्शवत

**कराड/प्रतिनिधी:–**

देश पुढे न्यायचा असेल, तर उद्योगासोबत शिक्षण, ज्ञान आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणे गरजेचे आहे. फक्त एआयसारख्या तयार तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता, ते निर्माण करण्याची क्षमता आपल्या तरुणाईत आहे. उद्योग, व्यवसाय केवळ नफा कमावण्याची साधने नसून गाव, समाज आणि देशाच्या विकासाची बलस्थाने असली पाहिजेत. सर्वांनी हा विचार केल्यास देश झपाट्याने पुढे जाईल, असे प्रतिपादन भारत फोर्जचे अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उद्योगपती पद्मभूषण डॉ. बाबासाहेब कल्याणी यांनी केले.

येथील यशवंतराव चव्हाण स्मृतीसदनात आयोजित कार्यक्रमात पी.डी. पाटील गौरव प्रतिष्ठानतर्फे

### लोकशाहीचे अस्तित्व संपल्यासारखे वाटते

आजची राजकीय परिस्थिती विदारक वाटते. समाजातील भान, शांतता, आपलेपणाची भावना कमी होत चालली आहे. मतभिन्नताही लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण असल्याचे यशवंतराव चव्हाण म्हणायचे. परंतु,आज मनभेद व व्यक्तीभेद वाढले असून, लोकशाहीचे अस्तित्व संपल्यासारखे वाटत असल्याची खंत उल्हासदादा पवार यांनी व्यक्त केली.

दिला जाणारा 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार-२०२५' उद्योगपती डॉ. बाबासाहेब कल्याणी यांना ज्येष्ठ गांधीवादी नेते, माजी आमदार उल्हासदादा पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील होते.

श्री. कल्याणी यांनी आपल्या उद्योग क्षेत्रातील वाटचालीसह समाजाभिमुख कार्यांचा आढावा घेतला. भारत फोर्जच्या सीएसआर उपक्रमांतर्गत सातारा जिल्ह्यातील शेकडो गावांमध्ये शिक्षण, स्वच्छता, रस्ते, पाणी या मूलभूत सोयीसुविधांची उभारणी झाली आहे. गावातील लोकांच्या सहभागामुळे या भागातील घरगुती उत्पन्न पाचपट वाढले असून, दोन वर्षांत ते आठपट नेण्याचे ध्येय आहे. गाव सोडून गेलेले लोक पुन्हा गावाकडे परतत आहेत, हीच खरी उपलब्धी आहे.



उद्योगपती डॉ. बाबासाहेब कल्याणी यांचा पुरस्काराने सपत्नीक गौरव करताना उल्हासदादा पवार, समवेत बाळासाहेब पाटील व अन्य मान्यवर.

देशाच्या प्रगतीबाबत बोलताना कल्याणी म्हणाले, आज भारत वेगळ्या गतीने पुढे जात आहे. मेक इन इंडियाच्या माध्यमातून आपण संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर झालो आहोत. आर्थिक सामर्थ्य आणि लष्करी ताकद ही देशाची खरी ओळख असून, त्यामुळे कोणताही देश आपल्याला कमी लेखू शकत नाही. भविष्यातील भारत हा शिक्षण, ज्ञान, तंत्रज्ञान आणि ग्रामविकास यांच्या बळावर सक्षम होईल.

पान ४ वर


# मराठा समाजाचे अधिवेशन राजधानीत

## मनोज जरांगे पाटलांनी दिला 'चलो दिल्ली'चा नारा

**धाराशिव/वृत्तसंस्था:–**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषण केले होते. त्यानंतर राज्य सरकारने मनोज जरांगेंच्या ८ मागण्यांपैकी ६ मागण्या मान्य करत हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जीआर काढला. हा मराठा समाजासाठी मोठा विजय मानला जात आहे. तसेच राज्यात लवकरच सातारा गॅझेट देखील लागू होण्याची शक्यता आहे. आता मनोज जरांगे यांनी राजधानी दिल्लीत जाणार असल्याची घोषणा केली आहे.

मनोज जरांगे यांनी चलो दिल्लीचा नारा दिला असून, मराठ्यांचे वादळ दिल्लीत धडकणार आहे. देशभरातील मराठा समाजाचे दिल्लीत अधिवेशन घेणार आहेत.



लवकरच या अधिवेशनाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या अंमलबजावणी नंतर दिल्लीमध्ये मराठा समाजाचे अधिवेशन होणार आहे. धाराशिवमध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे.

दरम्यान, मराठा आरक्षणासाठी मुंबईत मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला मोठे यश आले आहे. लाखो मराठा बांधवांनी या आंदोलनात सहभाग घेतला होता. सरकारने जरांगे पाटील यांच्या काही मागण्या मान्य केल्या असून, उर्वरित मागण्यांसाठी वेळ मागितला आहे.मराठा समाजाची प्रमुख मागणी असलेल्या 'हैदराबाद गॅझेट' लागू करण्याचा जीआर सरकारने काढला आहे. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी राजधानी दिल्लीत मराठा समाजाचे अधिवेशन घेण्याची मोठी घोषणा केली आहे.

हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असतानाच, ओबीसी समाजाने मात्र आक्रमक पवित्रा घेतला आहे. या जीआरला विरोध करत, ओबीसी समाजाला त्यांच्या कोट्यातून आरक्षण नको अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. दुसरीकडे, याच गॅझेटचा आधार घेत बंजारा समाज आणि आदिवासी समाजामध्येही संघर्ष सुरू झाला आहे. बंजारा समाजाची एसटी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी आहे, ज्यामुळे आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात विविध समाजगटांमध्ये तणाव वाढत आहे.

# उबाठाकडून राज्य सरकारच्या प्रतिमेचे दहन

**सातारा/प्रतिनिधी:–**

आवाज कोणाचा शिवसेनेचा, उद्धव साहेबांचा विजय असो, बाळासाहेब ठाकरे अमर रहे, अशा घोषणा देत शिवसेनेच्या उबाठाच्या कार्यकर्त्यांनी शिवतीर्थ परिसरात राज्य सरकारच्या प्रतिकात्मक प्रतिमेचे दहन करुन निषेध नोदंवण्यात आला. यावेळी उबाठाच्या कृषी विभागाचे जिल्हाप्रमुख प्रताप जाधव, साताराचे उपशहर प्रमुख गणेश अहिवळे यांनी राज्य सरकारला ठणकावत संबंधित समाजकंटकास पकडून आमच्या हवाली करा, असा इशारा दिला आहे.

प्रताप जाधव म्हणाले, स्व. मीनाताई ठाकरे यांच्या पुतळयाची विटंबना करण्याचे धाडस एका विकृताने केले आहे. त्याच्या निषेधार्थ आम्ही हे आंदोलन करत आहोत. येथे निषेध करण्याचे कारण एवढेच पालकमंत्री इथले आहेत. महाराष्ट्र किती जागृत आहे. महाराष्ट्र किती शाबूत आहे. हे या कृत्यावरुन दिसते. शिवसेना असल्या कृत्यांना



शिवतीर्थ दहन करताना उबाठाचे कार्यकर्ते.

दाद देत नाही. उद्धव साहेबांनी आम्हाला सांगितले आहे, शांतता राखा राज्यात अशा घटना घडत असल्याने हे सरकार निष्क्रीय आहे, असा आरोप त्यांनी केला.

गणेश अहिवळे म्हणाले, शिवसेना पक्षाच्या मॉ साहेबांच्या पुतळयाची विटंबना करण्याचे भ्याड कृत्य एका समाजकंटकांकडून झाले आहे. हे राज्याच्या कुणाच्या हातात आहे. हे अशा घडलेल्या घटनांवरुन दिसत आहे. आमचे उद्धवसाहेब ठाकरे, संजय राऊत हे कणखर नेते आहेत. त्यांची वाढती प्रतिष्ठा डोळयात खुपत आहे. म्हणून असले कृत्य घडवून आणले जात आहे. राज्य सरकारने आमच्या ताब्यात त्या समाजकंटकाला अटक करुन द्यावे, अशी मागणी केली आहे. यावेळी रमेश बोराटेसह इतर उपस्थित होते.

# इस्लामपूरात कार चालकाच्या धडकेत मोटरसायकलस्वार ठार

**इस्लामपूर/प्रतिनिधी:–**

इस्लामपूर-पेठ राज्य मार्गांवर एस.टी.स्टेंड समोर अज्ञात कारचालकाच्या धडकेत मोटरसायकलस्वार आकाश चंद्रकांत बाबर (वय २७, रा.पेठनाका ता. वाळवा) हा जागीच ठार झाला. तर हर्षद बापु सकटे (वय २१,रा.पेठनाका ता.वाळवा) हा गंभीर जखमी झाला आहे. या अपघातप्रकरणी अज्ञात कारचालकाविरोधात इस्लामपूर पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद प्रसाद सुर्यकांत बाबर यांनी दिली आहे.

याबाबत घटनास्थळ व पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, मंगळवार दि.१६ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १०.१५ च्या सुमारास पेठनाका ता. वाळवा येथील आकाश चंद्रकांत बाबर



व हर्षद बापु सकटे हे दोघे मोटरसायकल क्रमांक चक-१०-एझ-६१४० वरून आष्टा नाका ते पेठ रोडने पेठकडे निघाले होते. इस्लामपुर एस.टी. स्टॅण्ड समोर आले असता समोरुन येणा-या अल्टो कार क्रमांक MH-06--F-4247 ने मोटरसायकलला जोराची धडक दिली. या धडकेत आकाश बाबर रस्त्यावर आढळल्याने यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. अतिरक्तस्रावाने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर हर्षद बापु सकटे हा गंभीर जखमी झाला. अपघात झाल्यानंतर

कारचालकाने कारसह घटनास्थळावरून पलायन केले. एसटी स्टँड परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघाताची माहिती इस्लामपूर पोलिसांना मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. चारचाकी चालका विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# अपहरण आणि प्राणघातक हल्ल्यातील आरोपी गजाआड

## वाई पोलीसांनी सापळा लावून घेतले ताब्यात

**वाई/प्रतिनिधी:–**

वाईच्या पश्चिम भागातील चिखली गावात आपल्या बहिणीकडे जेवण करण्यासाठी पाचगणीचे उद्योजक अध्याय सतोष शेडगे हे आले होते ते परत रात्री आठ वाजण्याच्या सुमारास पाचगणीकडे जाण्यासाठी निघाले असताना त्यांच्या चारचाकी वाहनांवर अज्ञात व्यक्तींनी अचानक प्राणघातक हल्ला केल्याने परीसरात एकच खळबळ उडाली होती. सुदैवाने यात कोणीही जखमी नसले तरी वाहनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

या गंभीर घटनेची माहिती वाई पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जितेंद्र शहाणे यांना समजताच त्यांनी तातडीने घटना स्थळावर सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल गवळी डिबीचे प्रमुख असलेले सुधीर वाळुंज सहकारी पोलिस हवालदार विराज यादव श्रावण राठोड मंगेश जाधव या जबाबदार पोलिस अधिकार्यांचे पथक घटना स्थळावर पाठवले या पथकाने घडल्या प्रकाराची गोपनीय माहिती मिळवली आणि नुकसान झालेल्या वाहनाची पहणी करून हल्ला करून फरार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठीची दिशा निश्चित केली.

या तपास पथकाने घटनेचे गांभीर्य ओळखून यातील आरोपी गजाआड करायचाच अशी खुणगाठ बांधून न झोपता रात्रभर वाई ते चिखली अशा दहा कि.मी .अंतरा दरम्यान असणारे सर्व सीसीटीव्ही कॅमेरे आणी मोबाईल लोकेशन तपासणीचे काम युद्ध पातळीवर सुरू करून सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास हल्ला करून फरार झालेल्या आरोपीचे नाव व सविस्तर माहीती प्राप्त झाली.

या आरोपीच्या मुसक्या आवळून त्याला गजाआड करण्यासाठी या पथकाने जिवावर उदार होऊन चिखली गावातच आरोपी राहत असलेल्या घराच्या परिसरातच सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सापळा लावला आणी आरोपीला राहत्या घरातुनच ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याने आपले नाव अमोल गेणदेव वाडकर वय ३०असे सांगितले पण हा हल्ला हि केला नाही असे सांगताच पथकाने पोलिसी हिसका दाखवताच त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली . अवघ्या काही तासातच आरोपीला गजाआड केल्याने वाईच्या पश्चिम भागासह तालुक्यातील पाचगणी परिसरातील नागरिकांनी या पथकाचे अभिनंदन केले आहे.पाचगणीतील उद्योजक संतोष शेळके यांच्यावर हा दुसर्यांदा प्राणघातक हल्ला झाल्याने पाचगणीत एकच खळबळ उडाली आहे.

पाचगणी येथील उद्योजक संतोष शेळके यांच्या अपहरण प्रकरणाला अवघे पंधरा ते वीस दिवस उलटले असतानाच काल रात्री वाई तालुक्याच्या पश्चिम भागातील चिखली गावच्या हद्दीत त्यांच्यावर पुन्हा एकदा जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली .आहे.मिळालेल्या माहितीनुसार वाई तालुक्यातील चिखली गावच्या हद्दीत अध्याय संतोष शेळके यांच्या गाडीवर हल्ला चढवला यामध्ये वाहनाची मोठ्या प्रमाणात तोडफोड झाली मात्र शेडगे यांचा जीव थोडक्यात बचावला या घटनेने परिसरात प्रचंड खळबळ माजली . यापूर्वी देखील त्यांना बंदुकीचा धाक दाखवून मारहाण करण्यात आली होती.

### गुजगोष्टी..

खरा झाला हल्ला
हवीम्हणतात पुष्टी
कपोल कल्पित या
वाटे काहींना गोष्टी
सैनिकांचा पराक्रम
कौतुकात पुष्पवृष्टी
मनोउदात्तीकरणाने
जरा बदले अंतर्दृष्टि
नको अशा कुशंका
मन होई दुःखीकष्टी
एन केन प्रकारेण रे
उडवू पाहतात यष्टी
कशासद्यायचे पुरावे
किती करी अन्वेष्टि
अवनतकरे मनोबल
कृत्ये अशी अशिष्टि
सनसनाटीआरोपाने
सातत्याने अतिवृष्टी
मनअस्वस्थ कशास
कधीव्हायची संतुष्टी
विश्व हे अवघे पाहते
देशव्यापी रे दूर दृष्टी
नितळ मनाने पहावे
विलोभनीय ही सृष्टी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# दोन कोवळ्या कळ्यांना फसवणाऱ्या नराधमांच्या मुसक्या आवळल्या

## पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू ;शिराळा हादरले ! पण पोलिसांच्या शौर्याने पालकत्वाला मिळाला दिलासा

**शिराळा/प्रतिनिधी:–**

आपली पोटची पोर अचानक नजरेआड होते, तेव्हा आई-वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकते. काळजाचा ठोका चुकतो आणि डोळ्यासमोर अंधार दाटतो. शिराळा तालुक्यातील दोन कुटुंबांनी गेल्या काही दिवसांपासून ही भयाण अस्वस्थता अनुभवली. लग्नाचे खोटे स्वप्न दाखवून त्यांच्या दोन अल्पवयीन मुलींना पळवून नेण्यात आले होते. या घटनेने संपूर्ण तालुका हादरला होता, पण शिराळा पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेने आणि शौर्याने या दोन्ही कुटुंबांच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू आणले आहे.



अवघ्या ४८ तासांच्या आत, पोलिसांनी सातारा आणि थेट गुजरातच्या सुरत शहरातून या नराधमांच्या मुसक्या आवळल्या आणि त्या कोवळ्या कळ्यांना सुखरूप त्यांच्या घरी परत आणले.

एका घटनेत, तालुक्यातील १७ वर्षांच्या मुलीला रोहित करांडे नावाच्या तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले होते. मुलीच्या कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात धाव घेत टाहो फोडला. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न लावता तपासाची चक्रे फिरवली आणि सातारा येथून आरोपीला अटक केली. धक्कादायक म्हणजे, मुलगी अल्पवयीन आहे हे माहीत असूनही काही जणांनी आरोपीला आसरा दिला होता, त्यांच्यावरही आता कायद्याचा बडगा उगारला जाणार आहे.

दुसऱ्या घटनेत तर, अवघ्या १६ वर्षांच्या मुलीला अनिल सटाले या नराधमाने आपल्या जाळ्यात ओढले होते. त्याने तिला थेट गुजरात राज्यातील सुरत येथे पळवून नेले. तिथे त्याचा मामा अमोल बेंद्रे याने या दोघांना आसरा दिला. एका निरागस मुलीच्या आयुष्याशी खेळणाऱ्या या गुन्ह्यात साथ दिल्याबद्दल पोलिसांनी त्या मामालाही आरोपी केले आहे. पोलिसांनी सुरत गाठून आरोपी अनिल सटाले याला बेड्या ठोकल्या आणि मुलीची सुटका केली.

जेव्हा पोलीस त्या दोन्ही मुलींना घेऊन परत आले, तो क्षण अत्यंत भावनिक होता. आपल्या मुलीला सुखरूप पाहून पालकांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. त्यांनी पोलिसांचे आभार मानताना त्यांचे शब्दही अपुरे पडत होते. या दोन्ही आरोपींना न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस अधीक्षक संदीप घुगे, उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण पाटील आणि पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल अतिग्रे आणि त्यांच्या पथकाने ही कौतुकास्पद कामगिरी केली. त्यांच्या या धाडसामुळे दोन मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचले आणि समाजात पोलिसांप्रति विश्वासाची भावना अधिक दृढ झाली आहे.

# एकदाच उत्पन्नाचा दाखला द्या,अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती मिळणार

**मुंबई/प्रतिनिधी:–**

महाराष्ट्र सरकारने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. शिष्यवृत्तीसाठी ता वारंवार उत्पन्न दाखला आणि कागदपत्रे द्यावी लागणार नाहीत. महाडीबीटी पोर्टलवर एकदाच अपलोड केलेली माहिती ग्राह्य धरण्यात येणार असून ऑटो सिस्टीमद्वारे शिष्यवृत्ती वेळेत विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष आणि तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थी एकदाच उत्पन्नाचा दाखला आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करतात. ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन व ऑफलाइन पडताळणी करून केली जाते.



# ग्रामीण भागातील महावितरण विभाग 'चहा पेक्षा किटली गरम'

## कंत्राटी कामगाराचे वर्चस्व, अधिकारी गैरहजर, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हातात कारभार...!

**उंडाळे/प्रतिनिधी:–**

कराड दक्षिण मतदार संघातील ग्रामीण भागातील अनेक गावात महावितरण विभागाच्या कंत्राटी कामगारांचे वर्चस्व वाढत चालली आहे. अधिकारी गैरहजर राहत आहेत त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांची मनमानी सुरू झाली आहे. मनाला येईल ती रक्कम घेऊन वाटेल ती कामे केली जात आहेत सर्वसामान्य माणसं आपलं काम होण्यासाठी कार्यालयात गेली तर त्यांना उडवा उडवीची उत्तरे दिली जात आहेत. आपल्याकडे माणूस येईल त्याचं




काय असेल ते बघा आणि आपले काम करून घ्या असे उघडपणे अधिकारी बोलत आहेत. काले उंडाळे या भागामध्ये यांनी उत्तमात सुरू केला आहे. याची चौकशी वरिष्ठांनी करावी आणि संबंधितांना आपली नियुक्ती सर्वसामान्यांचे काम करण्यासाठी आहे. याची जाणीव करून द्यावी अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

मध्यावर्ती ठिकाण व महत्वाची बाजारपेठ म्हणून कराड दक्षिणेत उंडाळे व काले गावची ओळख असुन गावच्या आसपास गावासह,वाडी-वस्तील नागरिकांची सतत वर्दळ, दिसुन येत असल्यामुळे गावामध्ये व्यापारी बाजारपेठ मोठ्या प्रमात वाढल्याचे दिसुन येत. कराड सारख्या ठिकाणी जावुन खरेदारी करण्यात वेळ,पैसा खर्च होण्यासह वाहतुक समस्या उध्वभत असल्यामुळे उंडाळे, येळगाव,येवती,जिंती परिसरासह सांगली जिल्ह्यातील बहुतांश मध्यवर्ती पडणाऱ्या उंडाळे बाजारपेठेमध्ये खरेदीसाठी येत असल्यामुळे याठिकाणी व्यापारी बाजारपेठेत अनेक व्यवसायिकांनी दुकाने थाटली असल्याचे दिसुन येत आहे. सदरिल व्यवसायासाठी लागणारे विज कनेक्शनाच्या माध्यमातून 'विद्युत रोषणाई' करण्यात आल्यामुळे संध्याकाळपासुन रात्री ऊशीरापर्यंत बाजारपेठ खुली राहुन व्यवसायिक व नागरिकांची रेलचेल दिसुन येत असुन संबधित व्यवयिकानी घेण्यात आलेल्या विज कनेक्शनमध्ये व्यापारी गाळ्यामध्ये व्यवसायिक' विज कनेक्शन घेतल्याचे दिसुन येत,मात्र बाजार पेठेमध्ये रहिवासी ईमारतीमध्ये अनेक व्यवसयिकानी आपले दुकाने थाटली असुन संबंधित व्यवसियिकाच्या विज कनेक्शन'घरगुती' कनेक्शन मधुन घेण्यात आल्याचे प्रमाण ही मोठे दिसुन येण्यासह काही ठिकाणी घरातुन मोठ-मोठ्ठाले व्यवसाय करण्यात येत असल्याचे चित्र पाहणात येत आहे.

गावासह वाडि-वस्तीमध्ये मंनोरंजनासाठी वेगवेगळ्या केबल व्यवसायिकाचे जाळे पसरले असुन संबंधित 'केबल' व्यवसाय ही घरगुती विज कनेक्शनवर करण्यात येत असुन संबंधित महावितरण विभाग याबाबत 'मुग गिळुन गप्प का..? असा प्रश्न उपस्थित होतो, तर एखाद्या विज ग्राहक वेळेअभावी विजबिल भरण्यास असर्थ ठरल्यास वेळेमध्ये संबंधित अधिकारी, कर्मचारी पुर्वकल्पना न देता संबंधित ग्रा हकाचे विज कनेक्शन 'कट' करण्यात तात्पर असतानाअवैध' व्यवसायिक कनेक्शनवर मेहरबान' का...? संबंधित अवैध विज कनेक्शन चे महावितरण विभागाकडुन चौकशी करुन जबाबदार अवैध विज कनेक्शन वर कारवाई होणार का..? असा प्रश्न सर्वसामान्य विज ग्राहकामधुन होत आहे.

संबंधित महावितरण अधिकारी, कर्मचारी यांनी सर्व विज कनेक्शनची वेळोवेळी विज मीटरची चौकशी केल्यास 'मिटर' मधिल झोलझाल' समोर येवुन सर्वसामान्य ग्राहकावर पडणाऱ्या अतिरिक्त चार्ज वर नक्कीच फरक पडेल,मात्र मिटर चौकशीचं होताना दिसुन येत नाही.

### विज बिल भरण्यासाठी सक्ती,मात्र कामाच्या नावाने..बोबं..

महावितरण उंडाळे विभागा मार्फत दर महिना,टु महिना विज बिल भरण्यासाठी तगादा लावला जातो त्याचं बरोबर कोणताही अधिकार नसलेल्या कंत्राटि कामगार महिलेला पुढे करुन प्रसंगी विज बंद करण्यात येते, मात्र ग्राहकास एखाद्या वेळेस काही अडचण आल्या संबंधित अधिकारी, कंत्राटि कर्मचारी फोन हि उचलतं नाहीत मग हे अधिकारी काय कामाचे असा प्रश्न सर्वसामान्याकडुन उपस्थित होतं आहे..!

महावितरण विभागामार्फत थक्कित विज बिल वसुलीसाठी वरिष्ठ विभागाकडुन वेळोवेळी वेगवेगळ्या पथकाची नियुक्ती केल्याची चर्चा संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांकडुन सांगण्यासह कंत्राटि महिला कर्माचा-यांना प्राध्यान्य देण्यात येत आहे मात्र, संबंधित महिला कर्मचारी आपली जाहगीरी असल्याच्या आविर्भावात दिसुन येतात , तर संबंधित अधिकारी मात्र नियम-नियमावलीच्या गोष्टित गर्क असल्याचे नागरिकांना मधुन बोलंले जात आहे. संबंधित विभागाच्या पथकाची घरोघरी भेट देवुन विज बिल भरण्यावर संदेश देण्यात येतात,मात्र वरिष्ठ विभागालाही रहिवासी ईमारतीमधले चालु असणारे 'व्यवसायिक'विज कनेक्शन दिसत नाहित का..? त्यांच्यामध्ये काही आर्थिक हितं..संबंध दडलेत..का ..? कंत्राटि कामगार याच्यामध्ये जाणिवपूर्वक दिशाभुल करुन आपल्या स्वार्थ साधत आहेत..यांची शहानिशा करणार ..कोण.?

### व्यवसायिक कनेक्शन का..? चेक होत नाहित.?

उंडाळे महावितरण विभागात कार्यरत असणारे कर्मचारी हे त्या-त्या विभागातील ,गावातील संबंधित ग्राहकांच्या हितसंबंधातील असल्याने एखादि कारवाई करण्यास कचरत असल्याचे वेळोवळी स्पष्ट झाल्यानेचं संबंधित कर्मचारी त्यांची वेगळीचं कल्पनेत दिसुन येतात..तर व्यवसायिक कनेक्शन मधुन मलिदा खाण्यास कारणीभूत असल्याची चर्चा होतो,मात्र त्यास पाठबळ महावितरण अधिका-यांचे असल्याचे उघंड -उघडं बोलले जात आहे..यांच्यावर वरिष्ठ विभागाकडुन कोणतीही कारवाई न करता वेळोवळी पांघरुण घातले जात असल्याचे नागरिकांनची तक्रार असुनही वरिष्ठ विभाग हाताची घडी ,तोंडावर बोटं या अवस्थेत दिसुन येत आहे.

### अधिकारी, कर्मचारी फोन उचलण्यास असर्थ..

उंडाळे महावितरण विभागात कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी ग्राहकाचे फोन उचलण्यास धजवत नसुन समस्या सोडवण्यात असर्थ ठरत आहेत,तर विज थक्कित असलेल्या ग्राहकांना फोनसह प्रसंगी दिवस-रात्र हेलपाटे मारुन बैजार करतात,मात्र ग्राहकांच्या समस्या सोडण्यास फोन केल्यास फोन उचलण्या टाळा-टाळ करताना दिसुन येतात.

# कराड मर्चंटकडून सभासदांना १२ टक्के लाभांश

## सत्यनारायण मिणीयार; व्यवसाय ९०० कोटींपर्यंत; नफ्यात २७ टक्क्यांची भरघोस वाढ

***कराड/प्रतिनिधी : -***

कराड मर्चंट सहकारी क्रेडीट संस्थेने २०२४-२५ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. संस्थेच्या ठेवींमध्ये १०.५० टक्के, तर कर्ज वितरणात तब्बल १६ टक्क्यांची वाढ झाली असून, एकत्रित व्यवसाय तब्बल ९०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. चालू आर्थिक वर्षात हा व्यवसाय १००० कोटींचा टप्पा पार करेल, असा विश्वास संस्थेचे



कुटुंबप्रमुख श्री. सत्यनारायण मिणीयार यांनी व्यक्त केला.

मागील वर्षीच्या तुलनेत संस्थेच्या नफ्यात २७ टक्क्यांनी वाढ झाली असून एकूण १७ कोटी ३० लाखांचा ढोबळ नफा, तर सर्व तरतुदी वजा करता ८ कोटी ८७ लाखांचा निव्वळ नफा संस्थेला झाला आहे. सभासदांनी दाखवलेल्या अढळ विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत यंदा सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

संस्थेची आर्थिक घोडदौड सध्या संस्थेकडे ५२२ कोटींच्या ठेवी असून, ३६२ कोटींचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. प्रभावी वसुलीमुळे संस्थेचे ढोबळ व निव्वळ एनपीए नियंत्रणात ठेवण्यात यश आले असून निव्वळ एनपीए शून्य टक्के आहे. संस्थेचे स्वनिधी ६२ कोटींवर पोहोचले आहे, तर विविध बँकांत ३०० कोटींची गुंतवणूक करण्यात आलेली आहे.

संस्थेच्या २७ शाखा कार्यरत असून त्यापैकी १८ शाखा स्वमालकीच्या इमारतीत आहेत. इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, आरटीजीएस, एनईएफटी, लॉकर, क्यूआर कोड, स्पीकिंग बॉक्स अशा आधुनिक सुविधा सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सर्व शाखा सीबीएस प्रणालीवर कार्यरत असून ग्राहकांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सभेच्या प्रस्ताविक भाषणात संचालक डॉ. शरद क्षीरसागर यांनी संस्थेच्या प्रवासाचा आढावा घेतला. चेअरमन माणीकराव पाटील यांनी ठेवींचा ५०० कोटींचा यशस्वी टप्पा गाठल्याबद्दल सभासदांचे आभार मानले. संचालक अरविंद कलबुर्गी यांनी सभासद, कर्जदार व सेवकांच्या सहकार्याचे कौतुक केले.

### सामाजिक बांधिलकी जपली

नेहमीप्रमाणे यंदाही संस्थेने आपली सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबवले. कराड उपविभागीय कार्यालयात नागरिकांसाठी एअरपोर्ट बाकडी व जीवनावश्यक वस्तू भेट देण्यात आल्या. याशिवाय भगवान महावीर गोरक्षण ट्रस्ट, वाघेरी यांना १० लाखांची मदत, प्रयास आरोग्य गट, पुणे यांना १ लाख, तसेच पसायदान वृद्धाश्रम, कोल्हापूर यांना २ लाख ५१ हजारांची मदत संस्थेकडून देण्यात आली.

# कुंभारोशी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामसभा

**प्रतापगड/प्रतिनिधी:–**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत कुंभारोशी येथे ग्रामसभा उत्साहात पार पडली. या ग्रामसभेत गावातील लोकप्रतिनिधी, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील अधिकारी, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

ग्रामसभेत लोकसहभाग वाढवणे, ग्रामपंचायतीच्या कामाचे स्वयंमूल्यांकन करणे, गावाच्या विकासासाठी प्राधान्यक्रम ठरवणे, पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणे या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. तसेच अभियानातील पुरस्कार योजना व प्रोत्साहनात्मक उपक्रमांबद्दल माहिती देण्यात आली.

गावाच्या गरजांची नोंद व प्राधान्य ठरवणे : रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक सुविधा, स्वच्छता, आरोग्य व शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी व्यक्त केले.

पारदर्शक प्रशासन : ग्रामपंचायतीच्या चालू व पूर्ण झालेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. खर्चाचा हिशेब व कामाची प्रगती याबाबत ग्रामस्थांना माहिती देण्यात आली.

प्रोत्साहन व पुरस्कार : उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या पुरस्कार योजनांबद्दल माहिती देऊन गावकऱ्यांना सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

अभियानाचा कालावधी : १७ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या अभियानाचा समारोप ३१ डिसेंबर रोजी होणार असून, त्या कालावधीत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी योजना राबविण्याचा संकल्प ग्रामसभेत करण्यात आला.

ग्रामसभेस सरपंच कांचनाबाई सावंत, ग्रामपंचायत सदस्य सचिन सपकाळ, माजी सरपंच सखाराम ढेबे, माजी सरपंच रविकांत मोरे, पोलीस पाटील सतीश जंगम, छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक मोझर सर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका काळे मॅडम, आरोग्य विभागाचे कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांनी शासनाच्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवत गावाला आत्मनिर्भर बनविण्यासाठी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# कामगारांची थकीत देणी देण्याचे ब्राऊन पेपर टेक्नॉलॉजीला आदेश

## सातारा कामगार न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची कामगार संघटने कडून माहिती

***सातारा/प्रतिनिधी:***

शिरवळ येथील ब्राऊन पेपर टेक्नॉलॉजी या कंपनीला कामावरून अचानकपणे कमी केलेल्या तीनशे कामगारांची थकीत देणी पूर्वलक्षी प्रभावाने तत्काळ अदा करण्याचे आदेश सातारा कामगार न्यायालयाने दिले आहेत . याची माहिती ब्राऊन पेपर टेक्नॉलॉजी कामगार संघटनेच्या वतीने एडवोकेट रविंद्र जाधव यांनी दिली .



साताऱ्यात पत्रकार परिषद घेऊन कामगार संघटनेच्या वतीने या निर्णयाची माहिती देण्यात आली. यावेळी कामगार संघटनेचे अध्यक्ष रोझे हसन काझी, उपाध्यक्ष विठ्ठल दगडे,सेक्रेटरी ज्ञानेश्वर कावळे, पदाधिकारी बाळू राऊत,राजू चव्हाण, गणेश शिर्के इत्यादी उपस्थित होते .

जाधव पुढे म्हणाले १९८२ मध्ये ब्राऊन पेपर टेक्नॉलॉजी ही कंपनी मूळची शिर्के पेपर मिल या नावाने होती .मात्र अठरा वर्षानंतर शिर्के व्यवस्थापनाने ही जागा आणि यंत्रणा ब्राऊन पेपर टेक्नॉलॉजीला विकली . त्यानंतर जुलै २००४ मध्ये व्यवस्थापनाने कंपनी अचानक बंद करण्याचा बेकायदेशीर निर्णय घेतला .त्यामुळे आस्थापनेवरील ३०० कायमस्वरूपी कामगार हे बेकार झाले .त्यांनी सातारा कामगार न्यायालय जिल्हा सत्र न्यायालय, उच्च न्यायालय तसेच सुप्रीम कोर्ट अशा चार टप्प्यांमध्ये व्यवस्थापनाशी वेळोवेळी संघर्ष केला .मात्र ब्राऊन टेक्नॉलॉजी व्यवस्थापनाचे मुख्य संचालक शितू शास्त्री यांनी कंपनी आजारी असल्याचे कारण देत ही देणी देण्यास नकार दिला आहे .२०१० मध्ये उच्च न्यायालयाने सुद्धा सर्व कामगारांना पूर्वलक्षी प्रभावाने सर्व देणे देण्यासंदर्भात आदेशित केले आहे तरीसुद्धा कंपनी अवसायनात जाण्याची तयारीत आहे .

अवसायक व्यवस्थापनाकडे सुद्धा कामगारांनी त्यांची क्लेम हजर तारखेपासून दाखल केले आहेत .यासंदर्भात सातारा कामगार न्यायालयाने बी आय एफ आर लिक्विडेटर व ए ए आय एफ आर यांना सर्व कामगारांना २००४ सालापासून थकीत पगार मूळ पगार महागाई भत्ता इतर भत्ते शिल्लक रजा पगारापोटी सेवा शर्तीनुसार होणारी आजची अखेरची रक्कम अदा करण्याचे आदेश दिलेले आहेत.

यासंदर्भात कामगार न्यायालयाचे पत्र तातडीने जिल्हाधिकाऱ्यांना रुजू करण्यात येईल सदर कंपनीच्या मालमत्तेचा लिलाव पुकारून तब्बल ४६ कोटी रुपयांची देणी वसूल करण्यात येते . जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने प्रक्रिया सुरू होईल असे वकील रवींद्र जाधव यांनी सांगितले .

# रानभाजी महोत्सव तरुण पिढीसाठी आरोग्य मंत्र..

## माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर

**पाटण/प्रतिनिधी:–**

पाटण तालुका हा सह्याद्रीच्या कुशीत वसलेला तालुका आहे. येथील परिसर निसर्गसंपन्न दऱ्या खोऱ्यांनी नटलेला आहे. येथील दाट जंगलात विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींच्यासह विविध प्रकारच्या रानभाज्या सुद्धा खूप प्रमाणात आढळतात. मात्र आधुनिक जीवनशैलीमुळे आणि पाश्चिमात्य अन्नसंस्कृतीच्या प्रभावामुळे आजच्या तरुण पिढीस या रानभाज्यांचे ज्ञान कमी होत चालले आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, युवक मंडळे, आणि स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घेऊन रानभाजी महोत्सवाचे आयोजन करावे आणि पुढच्या पिढीसाठी हा नैसर्गिक वारसा जपावा असे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंहजी पाटणकर यांनी बी.डी. कॉलेज पाटण येथे आयोजित रानभाज्या महोत्सव उद्घाटन प्रसंगी सांगितले



रानभाज्या महोत्सव पाहणी करताना याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण आदी. तर यावेळी मार्गदर्शन करताना माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे वनस्पतीशास्त्र विभाग व रोटरी क्लब पाटण यांचे संयुक्त विद्यमाने रानभाजी व तृणधान्य महोत्सव आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते. यावेळो कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक, युवा नेत श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण प्राचार्य डॉ शिरीष पवार, प्रा. डॉ बी व्ही जाधव, रो. किशोर तुळसनकर, प्रा डॉ हेमलता काटे, प्राचार्य चेतन सावंत, प्रा. एस.ए.गायकवाड याची प्रमुख उपस्थिती होती.

माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर पुढे म्हणाले आपल्याकडे सह्याद्रीच्या दर्याखोऱ्यात उगवणाऱ्या अनेक औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या आहेत त्या आपल्या आरोग्यासाठी उपयोगी आहेत. ज्यांना याची माहिती आहे त्यांनी हा वसा पुढच्या पिढीला दिला पाहिजे. या भाज्या मध्ये भरपूर प्रमाणात लोह, कॅल्शियम, फायबर्स, अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे आढळतात. विशेषतः आजच्या धकाधकीच्या जीवनात रानभाज्या हे नैसर्गिक 'डिटॉक्स फूड' म्हणून उपयोगी ठरतात. असे ते म्हणाले.

या महोत्सवात ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये भारगा, टाकळा, वाईवरण, कोकणतोंडा, शेंडवळ, आळंबी,भोकर, उंबर, मुरड, अशा वेगवेगळ्या भाज्या वापरून विद्यार्थ्यांनी अतिशय रुचकर भाज्या बनविल्या होत्या. परीक्षकांनी स्पर्धेची पाहणी करून स्पर्धकांना रोख पारितोषिक देण्यात आली. रानभाजी महोत्सव स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून, प्रा. एस.ए. गायकवाड, प्रा. अनिल पाटील,प्रा. प्रवीण गायकवाड, प्रा.डॉ. रचना थरवल यांनी काम पहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी.व्ही.जाधव यांनी केले. आभार प्रा डॉ मंजुषा शिंदे यांनी मानले.

# जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरिता ३० सप्टेंबरपर्यंत नावनोंदणी

**सांगली/ प्रतिनिधी:–**

शांघाई (चीन) येथे पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ मध्ये जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धेकरिता सांगली जिल्ह्यातील इच्छुक व पात्र C'oXdmam§Zrhttps://skillindiadigital.gov.in/ या लिंकवर भेट देवून दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नावनोंदणी करून या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त इ. सि. शेख यांनी शासकीय प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा दर दोन वर्षांनी होत असते. सदर स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून जगभरातील सर्व २३ वर्षाखालील तरुणाकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची स्पर्धा ही ऑलिम्पिक खेळासारखीच आहे. यापूर्वी ४७ जागतिक कौशल्य स्पर्धांमध्ये ६३ सेक्टर मधून ५० देशातील १० हजार उमेदवार सहभागी झालेले असून सदर स्पर्धा १५ देशात १२ आठवड्यासाठी आयोजित करण्यात आलेली होती.

यापुढील जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ मध्ये शांघाई (चीन) येथे आयोजित होणार आहे. त्या अनुषंगाने स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्रांशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, Sector Skill Council, विविध औद्योगिक आस्थापना यांच्या सहकार्याने Skill Competition आयोजित करण्यात आले आहे. त्यानुसार सदर स्पर्धेचे आयोजन जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवर करून निवड केलेल्या उमेदवारांची नावे जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत.

## राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्यानिमित्त

# जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयाकडून शिबीरांचे आयोजन

**सातारा/प्रतिनिधी:**

राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याचे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये आयोजन करण्यात आले आहे. प्रमाणपत्र पडताळणी समिती सातारा या कार्यालयामार्फत विविध शिबीरांचे व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सर्व मागासवर्गीय, भटक्या जमाती, विमुक्त जाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग व सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्ग प्रवर्गातील पालकांनी आपल्या पाल्याचे जात वैधता प्रमाणपत्र त्यांच्या इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान अभ्यासक्रम व पदविका (तृतीय वर्ष अभ्यासक्रमात) शिकत असताना प्राप्त करणेकामी योग्य कागदपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव तयार करून आपल्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या मार्फत समितीस सादर करावेत, असे आवाहन जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य उमेश घुले यांनी केले आहे.

# जागीच बदलले नादुरुस्त 'लालपरी'चे इंजिन

## महाबळेश्वर आगारातील कर्मचाऱ्यांची अनोखी कामगिरी

**प्रतापगड/प्रतिनिधी:–**

गेल्या ७७ वर्षांपासून महाराष्ट्राच्या खेडोपाड्यांना अविरत व सुरक्षित सेवा देणाऱ्या एसटी महामंडळाने प्रवासी वर्गाच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. डोंगराळ भाग, दुर्गम गावे आणि प्रतिकूल हवामान यांचा विचार करता एसटी ही ग्रामीण भागातील जनतेसाठी जीवनरेखा मानली जाते. याचाच प्रत्यय महाबळेश्वर आगारातील कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा दिला आहे.

महाबळेश्वरच्या आगारातील कर्मचाऱ्यांनी एका नादुरुस्त झालेल्या बसचे इंजिन जागीच बदलून दाखवले. रेंगाळत असलेल्या सात तासांच्या अवघड कामगिरीनंतर बस पुन्हा रस्त्यावर धावू लागली. ही घटना सामान्य प्रवाशांसाठी आश्चर्यकारक तर कर्मचाऱ्यांसाठी कौतुकास्पद ठरली आहे.



महाबळेश्वर परिसरातील घाट रस्ते, दाट धुके, वीज नसलेली अंधारमय परिस्थिती अशा प्रतिकूल वातावरणात ही कामगिरी पार पडली. इंजिन खराब झाल्याने प्रवास ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली होती. पण एसटी कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे विद्यार्थी, नोकरदार व ग्रामीण भागातील प्रवासी यांना मोठा दिलासा मिळाला.

आगार प्रमुख श्री. केदार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मेकॅनिक व सहाय्यक कर्मचाऱ्यांनी परस्पर सहकार्याने ही जटिल दुरुस्ती पूर्ण केली. या प्रकारामुळे महाबळेश्वर तालुक्यातील प्रवाशांना सुरक्षित आणि अखंड सेवा मिळाली.

खरोखरच मुक्काम 'रेणोशी'पर्यंत बसचे काम पूर्ण होणे म्हणजे केवळ एका वाहनाचे रस्त्यावर येणे नव्हे, तर ग्रामीण भागाशी महाबळेश्वरचे दळणवळण सुरळीत राहणे होय. रेणोशी हा महाबळेश्वर तालुक्यातील एक महत्त्वाचा मुक्काम असून, गावागावातून लोक मोठ्या प्रमाणावर प्रवास करतात. इंजिन बदलल्यानंतर बस नेहमीप्रमाणे आपल्या मार्गावर धावू लागली आणि प्रवाशांनी सुटकेचा श्वास टाकला.

महाबळेश्वर हा अत्यंत दुर्गम व डोंगराळ तालुका आहे. दळणवळणाच्या सोयीसुविधा कमी असल्या तरी एसटी आगारातील कर्मचारी दिवस-रात्र मेहनत घेऊन प्रवाशांना सुरक्षित सेवा देत आहेत.

आगार प्रमुख श्री. पवार म्हणाले, प्रवासी वर्गाच्या सेवेसाठी आगारातील कर्मचारी नेहमीच तत्पर असतात. प्रतिकूल परिस्थिती असो वा तांत्रिक अडचणी, आमचा प्रयत्न प्रवासी सेवा कधीही खंडित होऊ नये हाच असतो.

महाबळेश्वर आगारातील कर्मचाऱ्यांनी केलेली ही कामगिरी केवळ एक तांत्रिक यश नाही, तर प्रवासी सेवा अखंड ठेवण्याच्या एसटीच्या परंपरेचे प्रतीक आहे. प्रवाशांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता, सात तासांच्या प्रयत्नांनंतर बसचे इंजिन बदलून दाखवणे ही कामगिरी सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.ग्रामीण भागातल्या लोकांसाठी, शालेय विद्यार्थ्यांसाठी आणि नोकरदारांसाठी लालपरी ही जीवनवाहिनी ठरली असून, या घटनेमुळे एसटीवरचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# आटपाडी खादी केंद्राला नवी ओळख मिळावी

## सादिक खाटीक

***आटपाडी/प्रतिनिधी : -***

आटपाडीच्या ऐतिहासिक खादी निर्मिती केंद्राला पुन्हा ऊर्जितावस्था मिळावी यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी ज्येष्ठ पत्रकार व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सादिक खाटीक यांनी केली आहे.

खाटीक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविलेल्या निवेदनात या केंद्रासाठी अतिरिक्त १०० एकर जमीन उपलब्ध करून देऊन तब्बल १००० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी मागणी केली आहे. यासंदर्भातील प्रत खासदार शरद पवार, माजी राज्यपाल राम नाईक यांच्यासह राज्यातील अनेक मान्यवरांना ई-मेलद्वारे कळविण्यात आली आहे.

खाटीक यांनी स्पष्ट केले की, आटपाडीचे खादी केंद्र हे स्वातंत्र्य सैनिकांच्या त्याग आणि योगदानाचे प्रतीक आहे.



स्वातंत्र्य चळवळीत आटपाडी तालुक्याने मोठी भूमिका बजावली असून भूमिगत राहून ब्रिटिशांविरोधात झुंज देणाऱ्या शेकडो स्वातंत्र्य सैनिकांना या भागाने आश्रय दिला होता. नाना पाटील, नागनाथ नायकवडी, रत्नाप्पा कुंभार यांसारख्या क्रांतिकारकांचे वास्तव्य येथे झाले होते. या स्मृतींना साजेसा गौरव व्हावा म्हणून खादी केंद्राच्या परिसरात भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांचे भव्य स्मारक उभारले जावे, अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तसेच या केंद्राला 'राम नाईक खादी केंद्र' असे नाव द्यावे, अशी मागणी खाटीक यांनी केली आहे. आटपाडीचे सुपुत्र राम नाईक यांनी राज्यपालपद भूषवून देशसेवेत योगदान दिले असल्याने त्यांचा गौरव खादी केंद्राच्या नावातून व्हावा, असे त्यांचे मत आहे.

दरम्यान, या केंद्राची सध्याची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे खाटीक यांनी अधोरेखित केले. कधीकाळी रोजगारनिर्मिती, खादीचा प्रसार आणि गांधीवादी विचारांचा प्रचार करणारे हे केंद्र आज मोडकळीस आले आहे. अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या असून विविध युनिट्स बंद पडल्याने एकेकाळी गजबजलेला परिसर ओसाड झाला आहे. ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीची ही संपत्ती वादग्रस्त अवस्थेत अडकली असून शासन व स्थानिक प्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे या केंद्राचा इतिहास लोप पावत आहे.

शासनाने तातडीने पुढाकार घेऊन हा वाद सोडवावा, केंद्राचे व्यवस्थापन स्वतःकडे घ्यावे आणि राखीव निधीच्या व्याजातून खादी तसेच हस्तकला, ग्रामीण उत्पादने, खाद्यपदार्थ, मेणबत्ती, साबण, बेकरी, सौंदर्य प्रसाधने, धातुकाम आदी लघुउद्योगांना चालना द्यावी, अशी मागणी खाटीक यांनी केली. आटपाडीकरांच्या घाम-रक्तातून उभे राहिलेले हे केंद्र पुन्हा जागतिक कीर्तीचे व्हावे, अशी जनतेची अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद केले.

# कन्याशाळा मलकापूरच्या ४ खेळाडूंची विभागीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड

**कराड/प्रतिनिधी : –**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा व श्री मळाईदेवी शिक्षण संस्था यांचे संयुक्त विद्यमाने शालेय शासकीय जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा ८ सप्टेंबर व ९ सप्टेंबर २०२५ रोजी मलकापूर येथे संपन्न झाल्या.

यावेळी स्पर्धेचे उद्घाटन शिवशंकर ज्वेलर्स कराडचे मा.अविनाश जगताप, तालुका क्रीडा अधिकारी रवी पाटील, महालक्ष्मी मोबाईल कराडचे विराज पाटील, श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचे सचिव शेतीमित्र अशोकराव भाऊ यांचे शुभहस्ते व उद्योजक लक्ष्मीनारायण सरलाया, मलकापूरचे ग्राममहसूल अधिकारी मा. दीपक कानकेकर, एस.बी.आय बँक मलकापूरच्या शाखा व्यवस्थापक मा. सौ.शर्वरी जोशी, केंद्रप्रमुख मा.गणेश जाधव, उद्योजक भालचंद्र जोशी, पर्यवेक्षक सुरेश राजे यांचे प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

सदर स्पर्धेतील सर्वप्रथम प्रथम आणि तृतीय विजेत्या संघास या मान्यवरांच्या शुभहस्ते आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवरांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेतील यशाचे कौतुक करीत विभागीय स्पर्धेसाठी सर्व यशस्वी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

सदर स्पर्धेत श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या कन्याशाळा मलकापूरच्या १४व १७ वर्षे वयोगटातील खेळाडूंच्या संघाने तृतीय क्रमांक संपादन केला. तसेच १४ वर्षे वयोगटातून कु. सिमरा पटेल तर १७ वर्षे वयोगटातून कु. स्वरा पाटील, कु. वैष्णवी लावंड, कु.समीक्षा मोरे या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळ करीत शालेय शासकीय विभागीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी सातारा जिल्हा संघातून आपले स्थान पक्की केले.या यशाने क्रीडा विभागाची यशस्वी परंपरा



कायम ठेवण्यात टेबल टेनिस खेळाडूंना यश मिळाले.

सर्व खेळाडूंना क्रीडाविभाग प्रमुख जयवंत पाटील, योगेश खराडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव शेतीमित्र अशोकराव थोरात भाऊ, अध्यक्ष पांडुरंग पाटील, उपाध्यक्ष भास्करराव पाटील, खजिनदार मा.तुळशीराम शिर्के, मार्गदर्शक संचालिका डॉ. सौ. स्वाती थोरात, संचालक प्रा संजय थोरात, वसंतराव चव्हाण, उद्योजक लक्ष्मीनारायण सरलाया, टेबल टेनिस प्रशिक्षक मा.लक्ष्मण जिरंगे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक मा.दिलीप चिंचकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुलोचना भिसे, पर्यवेक्षक सुरेश राजे,सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी पालक व विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी श्री मळाईदेवी शिक्षण संस्था, शिवशंकर ज्वेलर्स कराड,महालक्ष्मी मोबाईल कराड, एस.बी.आय बँक मलकापूर, दीपक कानकेकर, भालचंद्र जोशी, केंद्रप्रमुख गणेश जाधव सुप्रीम ग्राफिक्स मलकापूर यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यालयाच्या टेबल टेनिस संघाचे पालकवर्गातून विशेष कौतुक होत आहे.



टेंभुर्णी : शिक्षिका सौ. संध्याराणी देशमुख यांना पुरस्कार प्रदान करताना सरपंच सुरजा बोबडे, समवेत अन्य मान्यवर. (छाया : सचिन थोरात)

# संध्याराणी देशमुख नेशन बिल्डर पुरस्काराने सन्मानित

**चरेगाव/प्रतिनिधी : –**

टेंभुर्णी, ता. माढा येथील रोटरी क्लब टेंभुर्णीच्या वतीने सन २०२५ मध्ये देण्यात येणाऱ्या नेशन बिल्डर पुरस्काराने येथील महात्मा फुले विद्यालयाच्या शिक्षिका सौ. संध्याराणी देशमुख यांना नुकतेच सन्मानित करण्यात आले.

सोमवार, दि. १५ रोजी टेंभुर्णीतील रोटरी सांस्कृतिक हॉलमध्ये झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या, टेंभुर्णीच्या सरपंच सुरजा बोबडे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. कैलास करांडे होते. यावेळी रोटरी क्लब टेंभुर्णीचे अध्यक्ष दिपक व्यवहारे, सचिव संतोष तांबडे, सहाय्यक प्रांतपाल गोमतेश दोशी, सचिव संदीप मोकाशी, महात्मा फुले विद्यालय टेंभुर्णीचे मुख्याध्यापक बागवान, शिक्षक वृंद, तसेच टेंभुर्णीकर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श इन्स्टिट्यूटमध्ये ॲडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग व इलेक्ट्रिक व्हेईकल्स विषयावर डॉ. सचिन सावंत यांचे व्याख्यान संपन्न

**विटा/प्रतिनिधी:–**

लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचालित आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च सेंटर, विटा येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागामार्फत ॲडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग व इलेक्ट्रिक व्हेईकल्स या विषयावर तज्ञ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स, मुंबईचे व्यवस्थापक डॉ. सचिन सावंत हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.




डॉ. सचिन सावंत यांनी ॲडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग तंत्रज्ञानातील नवनवीन घडामोडी तसेच इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील प्रगती, संधी व आव्हाने याविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी यांत्रिकी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील कौशल्यविकास, संशोधन आणि नवकल्पना याकडे लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.

या व्याख्यानाला डिप्लोमा व डिग्री यांत्रिकी विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यांत्रिकी अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. आर. बी. पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील व डीन अकॅडेमिक्स डॉ. प्रा. एच. एस. जाधव यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सदाशिवराव (भाऊ) पाटील, अध्यक्ष ॲड. वैभव (दादा) पाटील, संचालक पी. टी. पाटील, संचालिका कु. पूजा पाटील व आर्थिक संचालक रवीराज सुर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले. डिप्लोमा व डिग्री विभागातील सर्व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डिप्लोमा यांत्रिकी विभागातील प्रा. ए. बी. शेख यांनी आभार मानले.

# जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**सांगली/प्रतिनिधी:–**

विविध आंदोलने, आगामी सण, उत्सव, जयंती, यात्रा, जत्रा, उरूस आदिच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित रहावी या करीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हादंडाधिकारी अशोक काकडे यांनी सन १९५१ च्या महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सांगली जिल्हा स्थलसिमा हद्दीत दि. १७ सप्टेंबर २०२५ ते १ ऑक्टोबर २०२५ अखेर पर्यंत पुढील कृत्ये करण्यास मनाई केली असल्याचे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या अथवा लाठ्या किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे आणि तयार करणे, व्यक्तीचे अथवा प्रेते किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे या कृत्यांना मनाई केली आहे. तसेच ज्याच्या योगाने शांतता व सुव्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्तेस धोका निर्माण होईल किंवा सभ्यतेला बाधा येईल अशा पध्दतीने हावभाव करणे, फलक चित्रे किंवा चिन्हे तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे आणि प्रसारीत करण्यास मनाई केली आहे. जिल्ह्यात परवानगीशिवाय पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर एकत्र जमण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय कर्मचारी, धार्मिक विधी, अंत्यविधी व परीक्षा यांना लागू राहणार नाही. हा आदेश दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजल्यापासून ते दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजीचे २३.५९ वाजेपर्यंत अंमलात राहील, असे आदेश जिल्हादंडाधिकारी अशोक काकडे यांनी जारी केले आहेत.

# राज्यस्तरीय कराओके गायन स्पर्धेचे कराडमध्ये आयोजन

**कराड/प्रतिनिधी : –**

येथील महंमद रफी म्युझिक ॲ कॅडमी यांच्या वतीने राज्यस्तरीय कराओके गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी स्पर्धा होणार असून, विजेत्यांना रोख बक्षीस, ट्रॉफी व प्रमाणपत्र दिले जाणार आहे, अशी माहिती ॲसकॅडमीचे महागुरू असिफ बागवान यांनी दिली आहे.

कराड येथील अर्बन शताब्दी हॉल येथे सकाळी १० वाजता स्पर्धा सुरू होईल. प्रथम विजेत्यास ५ हजार, व्दितीय ३ हजार, तृतीय २ हजार व चौथ्या आणि पाचव्या क्रमांकासाठी प्रत्येकी १ हजार रूपये रोख, तसेच ट्रॉफी व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. दोन राउंडमध्ये स्पर्धा होणार असून, पहिल्या राउंडमधून पहिल्या दहा स्पर्धकांना निवडण्यात येवून, दुसर्या् राउंडमध्ये गायनाची संधी दिली जाणार आहे. यातून अनुक्रमे पहिले पाच स्पर्धक बक्षीसांसाठी निवडले जातील. सहभागी प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र दिले जाणार आहे. नाव नोंदणी २ ऑक्टोबरपर्यंत ७४९८९६१३३८ करावयाची असून, या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



# श्री राजलक्ष्मी रॉयल अकॅडमीत अभियंता दिन उत्साहात साजरा

**विटा/ प्रतिनिधी:–**

श्री राजलक्ष्मी रॉयल अकॅडमीत अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी आर्टिफिशल इंटेलिजन्स व इंजिनियरिंगमधील नवनवीन संधी या विषयावर प्रा.सूरज पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

व्याख्यानादरम्यान प्रा.सूरज पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत इंजिनिअरिंगच्या शिक्षणासाठी बारावीनंतर आर्टिफिशल इंटेलिजन्स, कॉम्प्युटर सायन्स ण्ड टेक्नॉलॉजी,बी.ई., बी.टेक, बी आर्किटेक, टोमोबाईल इंजिनिअरिंग सिव्हील इंजिनिअरिंग या इंजिनिअरिंगच्या शाखा आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती दिली. विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमाला उत्स्फूर्त सहभाग मिळाला.

# धनाजी घोरपडे यांच्या कवितासंग्रहास सांडू पुरस्कार जाहीर

**इस्लामपूर/प्रतिनिधी : –**

बहादुरवाडी (ता. वाळवा) येथील कवी धनाजी धोंडीराम घोरपडे यांच्या 'जामिनावर सुटलेला काळा घोडा' या कवितासंग्रहास मुंबई येथील कै. दत्तात्रय कृष्णा सांडू प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातून आलेल्या कवितासंग्रहात सर्वोत्कृष्ट कलाकृती म्हणून 'जामिनावर सुटलेला काळा घोडा' या संग्रहाची निवड परीक्षकांनी केली आहे. रोख रक्कम पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते चेंबूर (सांडू वाडी) मुंबई येथे होणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष आनंद श्रीधर सांडू यांनी दिली.



मुंबईच्या ललित पब्लिकेशनने त्याचा हा कवितासंग्रह प्रकाशित केला असून, सदर कवितासंग्रहास गोमंतक साहित्य सेवक मंडळ पणजी–गोवा यांचा उत्कृष्ट वाड्मय पुरस्कार, पद्मश्री नामदेव ढसाळ काव्य प्रतिभा पुरस्कार, कवी केशवसुत उत्कृष्ट वाड्मय राज्यस्तरीय पुरस्कार, चांदवड वाचनालयाचा उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या इस्लामपूर शाखेचा लोकनेते राजारामबापू उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार मिळाला आहे.

हा कवितासंग्रह महाराष्ट्रभर चर्चेत असून चोखंदळ वाचक व साक्षेपी समीक्षकांनी याची प्रशंसा केली आहे. या यशाबद्दल धनाजी धोंडीराम घोरपडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनच्या अध्यक्षपदी नियाज मुल्ला

***इस्लामपूर/प्रतिनिधी : –***

ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशन, कासेगावच्या शाखाप्रमुखपदी सामाजिक कार्यकर्ते नियाज मुल्ला यांची निवड करण्यात आली. वाळवा तालुक्याचे अध्यक्ष तोसीफ वलांडकर यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

यावेळी वाटेगावचे ओबीसी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष जुबेर जमादार, सामाजिक कार्यकर्ते मुंतशीर पटेल, काँग्रेसचे अक्षय फाटक, तसेच कासेगाव मुस्लिम समाजाचे मुफ्ती इम्रान मुल्ला, चांदसो मुल्ला, बालेखान मुल्ला, मुजीब मुल्ला, मोहसीन मुल्ला, रियाज मुल्ला, रमजान मुल्ला, बबलु डांगे,शाहरुख आत्तार, इम्रान आत्तार, शकील आत्तार आदी मान्यवर, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्तिथ होते.

याप्रसंगी ओबीसी ऑर्गनायझेशनचे इस्लामपूर शहराध्यक्ष फिरोज पटेल आणि तालुकाध्यक्ष तौसिफ़ वलांडकर यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रस्ताविक जुबेर



नाईकवडी, तर हाफिज अजहर खलिफा यांनी आभार मानले.

# शिक्षण–तंत्रज्ञानातूनच भारताचे भविष्य उज्ज्वल

**पान १ वरुन**

पी.डी. पाटील पाटील यांनी तब्बल ४३ वर्षे नगराध्यक्षपद भूषवत कराड शहराचा आमूलाग्र विकास केला, आदर्श सांडपाणी व्यवस्था राबवली, दूरदृष्टीतून चांगले काम करण्याची हिम्मत दाखवली. आज त्यांच्या प्रतिष्ठानचा मिळणारा पुरस्कार हा आपल्या मातीतला पुरस्कार असल्याने आनंददायी असल्याचे डॉ. कल्याणी यांनी सांगितले. तसेच पुरस्काराची रोख रक्कम त्यांनी प्रतिष्ठानलाच देणगीरुपी परत केली.

उल्हासदादा पवार म्हणाले, यशवंतराव चव्हाण यांच्या प्रभावळीत अनेक लोक होते, त्यात एक पी.डी. पाटील होते. त्यांनी कराड शहराचा सर्वांगीण विकास घडवून आणला. त्यांचा सामाजिक व राजकीय वारसा पुढे नेण्याचे काम बाळासाहेब पाटील करत आहेत. सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व काळापासून किर्लोस्कर, ओगले, कल्याणी हे उद्योजक होते. आज बाबासाहेब कल्याणी उद्योग क्षेत्रात अग्रणी आहेत. कल्याणी यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, त्यांच्या कार्याची यशस्वी पताका जगभरात उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बाळासाहेब पाटील म्हणाले, कराड, साताऱ्याच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांच्यासह अनेकांनी योगदान दिले. यांत उद्योजक निळकंठराव कल्याणींचाही समावेश आहे. त्यांनी देश व जागतिक पातळीवर मोठे नाव कमावले. त्यासोबतच त्यांनी सातारा, कराडसह आपल्या गावाची नाळ कायम ठेवत सामाजिक बांधिलकी जोपासली. आज उद्योग, व्यवसाय पुढे नेत सीएसआरच्या माध्यमातून जवळपास १२० गावे दत्तक घेऊन तेथे सोयीसुविधा निर्माण करण्याचे काम बाबासाहेब कल्याणी करत आहेत. जिल्ह्यात त्यांनी मोठे काम उभारले आहे. तसेच साहित्यिक, राजकारणी, समाजकारणी उल्हासदादा पवार यांनीही लोकहिताची अनेक कामे केली. या दोघांचे कार्यक्षेत्र पुणे असले, तरीही त्यांनी आपल्या सातारा जिल्ह्याची नाळ कायम ठेवल्यास त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात अशोक गुजर यांनी प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेत पी.डी. पाटील यांनी कराड शहराच्या केलेल्या सर्वांगीण विकासाचा पॅटर्न राज्यभरासाठी आदर्शवत ठरल्याचे सांगितले. प्रारंभी, विठामाता विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अशोकराव गुजर व विश्वस्त रेश्मा कोरे स्वागत यांनी केले. परिचय विजय साळुंखे व शहाजी क्षीरसागर यांनी करून दिला. मानपत्र वाचन ॲड. मानसिंगराव पाटील यांनी, तर दिलीपराव चव्हाण यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आज का अंदाज

**गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| २ - ३ - ६ - ९ | २ - ५ - ६ - ७ |
| ११०-५९९-४४८-११७ | ५७०-३३९-२४०-१७९ |
| २००-४९०-७९०-५६८ | २५५-१७७-३६७-३५९ |
| ३९०-३००-३४९-३८८ | ३४५-२४९-४६६-२७८ |
| **जोडी** | **जोडी** |
| २४ - ३४ - ६१ - ९१ | २९ - ५१ - ६४ - ७४ |
| २७ - ३७ - ६८ - ९८ | २८ - ५९ - ६३ - ७३ |
| २० - ३० - ६५ - ९५ | २१ - ५८ - ६० - ७० |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १८-१९ सप्टेंबर

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सर्व बाजार साठी | १९ | ४९ | ७३ | ८३ |
| | १० | ४० | ७५ | ८५ |
| | १२ | ४२ | ७६ | ८६ |
| | २३६ | ३४७ | २६९ | १२५ |
| | ४७० | २२० | ४५८ | २७९ |
| | ३८० | १४९ | ३५९ | ४६८ |

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे | | | | | | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८९ | | २३४ | | ३४६ | | १८९ | | १७८ | | २३० | |
| ११८ | ० | ३७९ | ९ | ४९० | ३ | ३७८ | ८ | ३५८ | ६ | ३४८ | ५ |
| २३५ | | ४७८ | | ५८० | | २२४ | | २७७ | | ७८० | |

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज डे | | | | | | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४६ | | ४४६ | | २४० | | १२० | | १६८ | | १६० | |
| ३९० | २ | ३४७ | ४ | ३६७ | ६ | २५६ | ३ | ३४८ | ५ | ३४० | ७ |
| ४८० | | ५९० | | ४६६ | | ३४६ | | २६७ | | २७८ | |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे | | | | | | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५५ | | ३०० | | २६६ | | २३७ | | २४९ | | १३४ | |
| ४७० | १ | ६७० | ३ | ६९९ | ४ | ५७० | २ | ४५६ | ५ | ३५० | ८ |
| ५६० | | ४४५ | | ७७० | | ४८० | | ३५७ | | ५६७ | |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे | | | | | | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४९ | | ६९० | | १५० | | १७० | | ३६० | | ३७० | |
| २४८ | ४ | ७८० | ५ | २६८ | ६ | ३६९ | ८ | ४५० | ९ | ४६० | ० |
| ३४७ | | ५०० | | ७९० | | २६० | | ५५९ | | ५५० | |

**सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज**

० - ८ - ९ - २

६

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १५-०९-२०२५ १६-०९-२०२५ १७-०९-२०२५

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# चव्हाण विद्यालयात स्व.पी.डी.पाटील यांना अभिवादन

**मसूर/प्रतिनिधी : –**

सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक, तसेच सह्याद्री शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.पी.डी. पाटील यांचा १७ वा पुण्यस्मरणदिन यशवंतनगर (ता. कराड) येथील यशवंतराव चव्हाण विद्यालयात संपन्न झाला.

याप्रसंगी वेणूताई चव्हाण महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बी.एन. कालेकर व सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजेंद्र पाटील पार्लेकर यांच्या हस्ते स्व.पी.डी. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कालेकर यांनी स्व.पी.डी. पाटील यांच्यासमवेत अनुभवण्यात आलेल्या अनेक आठवणींना



उजाळा देत साहेबांच्या शैक्षणिक, सामाजिक व सहकारातील कार्याचा पट उपस्थितांसमोर उलगडला. दरम्यान, कारखाना कार्यस्थळावरील स्व.पी.डी.पाटील यांच्या स्फूर्तीस्थळावर अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. मुख्याध्यापक ए.एस. राऊत, संस्थेचे सचिव एस.व्ही. चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ए.जे. जाधव यांनी केले.

# राष्ट्रभाषा म्हणून हिंदी श्रेष्ठच:धनंजय बामणे

**इस्लामपूर/प्रतिनिधी : –**

स्वातंत्र्य पुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात हिंदी भाषेने प्रांता–प्रांतातील लोकांना एकत्र आणले. सामाजिक उत्तरदायित्व निभावत राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली.राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषा श्रेष्ठच आहे, असे मत धनंजय बामणे यांनी व्यक्त केले.

पेठ, ता. वाळवा येथील कासेगाव शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.बी. माने होते.

हिंदी भाषेची उत्पत्ती, महत्व, विकास व आवश्यकता याविषयी हिंदी विषय शिक्षक एस.पी. डबाणे, एम.व्ही. भोपळे यांनी माहिती दिली. यावेळी राजवर्धिनी



मस्के, वसुंधरा खोत, राजनंदिनी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. दरम्यान, ओझोन दिनानिमित्त कार्याध्यक्ष एन.डी. पाटील यांनी ओझोन संरक्षण दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. तर सेजल पाटोळे, अनुष्का पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास उपकार्याध्यक्षा जयश्री शेळके, आर.पी. मोहिते, उमा ठाणेकर, अर्चना ढवळीकर, वर्षाराणी बंडगर, एस.एम. नलवडे, शिला माळी, पी.एस. गावडे, सरस्वती कदम, नलिनी पाटील, राणी जामदार, मनिषा पाटील, वैशाली खोत, प्रा. नयना वळीव, ए.आर. पाटील, माधुरी पाटील, चंद्रकांत खाडे, संग्राम पाटील, गुंडा जाधव, सुहास कुंभार यांसह विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक वर्षाराणी बंडगर, यांनी केले. सूत्रसंचालन कनक वाटखेडे व स्वराली देशमाने, भारती गावित यांनी आभार मानले.

**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

## नशिबाची परीक्षा

**गुरुवार १८ सप्टेंबर २०२५**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-६-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 140 | 5-8 | 170 | 51-28-36-90-84 |
| 230 | | 189 | |
| 690 | | 800 | |

### कल्याणम

उदय-अस्त | सिंगल ३-४-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 120 | 3-6 | 123 | 31-06-42-87-69 |
| 670 | | 240 | |
| 337 | | 330 | |

### मुंबैम ( मेन )

उदय-अस्त | सिंगल १-६-७ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 146 | 1-2 | 156 | 10-92-63-74-28 |
| 128 | | 129 | |
| 470 | | 228 | |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

# कोयनेतील लाँच चालकांकडून मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचा सत्कार

**महाबळेश्वर/प्रतिनिधी:-**

कोयना जलाशयातील दुर्गम व डोंगराळ भागातील जलवाहतुकीसाठी मागील काही काळापासून लाँच व बार्ज यांच्या देखभाल दुरुस्ती व इंधनावरील खर्च आणि कर्मचाऱ्यांच्या मानधनाची मागणी प्रलंबित होती. राज्य शासनाच्या न विभागाने ७८ लाख ७ हजार २८२ रुपयांचा निधी वितरण करण्यासाठी शासन मान्यता देण्यात आली आहे. याबद्दल लाँच चालकांकडून मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचा सत्कार करण्यात आला.



कोयना जलाशयाच्या पाणीसाठ्यामुळे बाधित झालेल्या गावांतील नागरिकांच्या दळणवळण व संपर्कासाठी १९७६-७७ पासून तापोळा (ता. महाबळेश्वर) परिसरात जलवाहतूक सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. हा तराफा केळघर, तर्फ सोळशी, तापोळा व गाढवली दरम्यान छोट्या- मोठ्या वाहनांची पाण्यातून वाहतूक करत असतो. त्यामुळे कोयना जलाशयावरील साताऱ्यातील दुर्गम व डोंगराळ भागात दळणवळणाचा कणा म्हणून तराफा वाहतूक समजली जाते. हा भाग दुर्गम असून, पर्यटक आपली वाहने तराफ्यातून घेऊन जात असतात. स्थानिक साताऱ्याला जा-ये करण्यासाठी आपली वाहने घेऊन जातात.

तापोळा येथील जलवाहतुकीसाठी सध्या कार्यरत असलेल्या १२ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याचा प्रश्न प्रलंबित होता. याबाबत मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत मदत व पुनर्वसन विभागामार्फत अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेतला होता. त्यानुसार १२ कर्मचाऱ्यांच्या ऑक्टोबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील वेतन, भत्ते व मानधन अदा करण्यासाठी ४४ लाख ७ हजार २८२ रुपये व लाँच बार्जेसच्या देखभाल व दुरुस्ती व इंधनासाठी ऑक्टोबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी ३४ लाख असा एकूण ७८ लाख ७ हजार २८२ रुपयांचा निधी पुणे विभागीय आयुक्तांना वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांनी लाँच चालकांकडून मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचा सत्कार केला. देवेश शेलार, रमेश कदम, प्रकाश कदम व इतर उपस्थित होते.

# ओबीसींच्या आरक्षणाला धक्का देणारा शासन आदेश रद्द करा

## अन्यथा आंदोलन:विटा शहर सकल ओबीसी समाजाचा राज्य सरकारला इशारा

**विटा/ प्रतिनिधी:-**

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का देणारा अन्यायी शासन आदेश रद्द करण्यात यावा अथवा त्याला स्थगिती द्यावी तसेच शासकीय नोकरीमधील रिक्त ओबीसी कोटा तात्काळ भरण्यात यावा, अशी मागणी विट्यातील सकल ओबीसी समाज संघटनेने केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास ओबीसी समाजातर्फे राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. याबाबतचे निवेदन विटा शहर सकल ओबीसी समाज बांधवतर्फे विटा तहसिलदार व प्रांताधिकारी यांना देण्यात आले आहे.



विटा शहर सकल ओबीसी समाजाच्या वतीने विटा तहसिलदार व प्रांताधिकारी यांना नुकतेच निवेदान देण्यात आले आहे. ओबीसी समाजाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पत्र पाठवले आहे. या पत्रात असे नमूद आहे की, ओबीसी आरक्षणाबाबत मंगळवार दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी आपल्या शासनाने शासन आदेश पारीत केला आहे. सदर शासन आदेश राज्य सरकारच्या वतीने मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखल्याच्या माध्यमातुन ओबीसी आरक्षण असुन तो सकल महाराष्ट्रातील ओबीसी समाज आरक्षणाला संपवणारा आहे. सदर आदेश रद्द करण्यात यावा अथवा त्याला स्थगिती देण्यात यावी व ओबीसी समाज आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला वेगळे आरक्षण लागू करावे, अशी मागणी आहे.

सकल ओबीसी समाजाने निवेदनात म्हटले आहे की, शासकीय नोकरीमधील रिक्त ओबीसी कोटा तात्काळ भरण्यात यावा. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील ओबीसी विद्यार्थी शिष्यवृत्ती पुर्वीच्या प्रचलित पद्धतीने देण्यात यावी. तसेच ओबीसी समाजाच्या प्रगतीसाठी असलेल्या सर्व महामंडळाच्या निधीमध्ये भरीव तरतूद करण्यात यावी. या मागण्या मान्य न झाल्यास येणाऱ्या काळात ओबीसी समाजाच्या वतीने राज्यभर मोठे आंदोलन उभे केले जाईल, असा इशाराही सकल ओबीसी समाजाने दिला आहे. निवेदनावर किरण तारळेकर, प्रताप सुतार, अविनाश महामुनी, संदीप मेटकरी या पदाधिकार्यांच्या व कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# ब्रह्मदास महिला पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

## संस्थेचा पावणे पाच कोटींचा एकूण व्यवसाय

**कराड/प्रतिनिधी : -**

ब्रह्मदास ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., बेलवडे बुद्रुक या संस्थेच्या ब्रह्मदास महिला पतसंस्थेची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या चेअरमन सौ. उज्वला वसंतराव मोहिते होत्या. यावेळी व्हाईस चेअरमन सौ. उषा मोहिते यांच्यासह सर्व संचालिका उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना चेअरमन सौ. उज्वला मोहिते म्हणाल्या, ब्रह्मदास ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेसोबतच संस्थेच्या महिला पतसंस्थेचीही यशस्वी वाटचाल सुरू आहे. वीस वर्षांत संस्थेने सभासदांचा विश्वास संपादन केला असून, कर्मचाऱ्यांच्या कार्यतत्परतेने संस्थेचे कामकाज उत्कृष्टरित्या सुरू आहे. संस्थेने सभासदांना वेळोवेळी कर्जपुरवठा केला असून, सभासद, ठेवीदार व हितचिंतकांनी यापुढेही संस्थेस सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

संस्थेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेताना व्यवस्थापिका सौ. स्वाती मोहिते म्हणाल्या, महिला पतसंस्थेच्या एकूण ठेवी २ कोटी ६९ लाख रुपयांच्या आहेत. संस्थेने १ कोटी ९७ लाख रुपयांचे कर्ज वितरण केले असून, संस्थेत २ लाख ७९ हजारांचा नफा झाला आहे. तर संस्थेने ४ कोटी ६७ लाखांचा एकत्रित व्यवसाय केला असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्लार्क विश्वास शेवाळे यांनी केले. व्यवस्थापिका सौ. स्वाती मोहिते



यांनी अहवाल वाचन केले. व्हाईस चेअरमन सौ. उषा मोहिते यांनी आभार मानले. सभेस सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

# वेण्णा लेकवरील बोटमनचे उपोषण कायम ;दुर्लक्षाचा आरोप

**महाबळेश्वर/प्रतिनिधी : -**

महाबळेश्वर नगरपरिषदेच्या अखत्यारीतील वेण्णा लेक या प्रमुख पर्यटनस्थळावर बोटिंग सेवा पुरवणारे बोटमन गेल्या दोन दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. तब्बल ५३ बोटमन या आंदोलनात सहभागी झाले असून, त्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

बोटमननी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून जनतेपुढे आपली भूमिका मांडली. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आम्ही नगर परिषदेचेच कर्मचारी आहोत, हे अधिकृतरीत्या लेखी द्यावे. किंवा महाबळेश्वर नगरपरिषदेच्या नावाने आम्हीच बोट सेवा चालवतो, हे प्रशासनाने मान्य करावे, अशी त्यांची मागणी आहे. बोटमननी या मागणीसाठी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दाद मागण्याचा इशारा दिला आहे.

आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, नगरपालिकेच्या प्रशासनाने मुद्दामहून या गंभीर प्रश्नाकडे डोळेझाक केली असून, वेण्णा लेकवरील हजारो पर्यटकांच्या सुरक्षेशी निगडित असलेल्या बोटिंग सेवेबाबत निष्काळजीपणा केला जात आहे. परिणामी बोटमननी उपोषणाचा मार्ग अवलंबला. दरम्यान, उपोषणस्थळी काही कर्मचारी अस्वस्थ झाल्याने डॉ. पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन त्यांची तपासणी केली.

पर्यटकांसाठी महाबळेश्वरची ओळखच बनलेले वेण्णा लेक हे स्थानिक अर्थकारण व पर्यटन उद्योगाचा कणा मानले जाते. दररोज हजारो पर्यटक येथे बोटिंगचा आनंद घेतात. मात्र बोटमनच्या उपोषणामुळे सेवा ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली असून, पर्यटन हंगामावर याचा थेट परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिक व सामाजिक संघटनांनी प्रशासनावर टीका करताना म्हटले आहे की, वेण्णा लेक हे महाबळेश्वरचे हृदय आहे. येथे काम करणाऱ्या बोटमनना कर्मचारी म्हणून मान्यता नाकारणे म्हणजे केवळ अन्यायच नव्हे, तर पर्यटनावर कुऱ्हाड मारण्यासारखे आहे.

# गुलाबाच्या फुलातून दिला पोलिसांचा सुरक्षेचा सुगंधी संदेश

**माळेगाव/प्रतिनिधी:-**

माणसाचे आयुष्य हे अमूल्य आहे आणि ते सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक वाहनचालकावर आहे-याच भावनेतून माळेगाव पोलिसांनी चालक दिनाच्या निमित्ताने अनोखा उपक्रम राबवला. १७ सप्टेंबर रोजी नीरा-बारामती मार्गावर वाहनचालकांना गुलाबाचे फूल देत वाहतूक नियमांचे पालन करण्याचे अनोखे आवाहन करण्यात आले.



या जनजागृती मोहिमेचे नेतृत्व सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे यांनी केले. त्यांच्या सोबत वाहतूक शाखेतील अंमलदार पो.कॉ. अमजद शेख, संदीप वाघमोडे व गणेश खंडागळे यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

मोहीमेच्या माध्यमातून दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना हेल्मेटचा नियमित वापर, वाहनांचा वेग नियंत्रित ठेवणे, सिग्नलचे पालन करणे व रस्त्यावर शिस्त राखणे यावर विशेष भर देण्यात आला. गुलाबाच्या फुलासह दिलेले प्रेमळ संदेश वाहनचालकांच्या मनाला भिडले.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक लोखंडे यांनी नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले, रस्त्यावरची सुरक्षा ही केवळ पोलिसांची जबाबदारी नाही. प्रत्येक चालकाने नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटेल. हेल्मेट व सीटबेल्ट हे आपल्या आयुष्याचे रक्षण करणारे कवच आहेत. सुरक्षितपणे घरी परतणे हेच खरे यश आहे.

या उपक्रमामुळे वाहनचालकांमध्ये आनंदाची लहर निर्माण झाली. गुलाबाच्या फुलासोबत मिळालेल्या सुरक्षेच्या शुभेच्छांनी चालक दिन अधिक अर्थपूर्ण ठरला. माळेगाव पोलिसांचा हा उपक्रम जनजागृतीसोबतच नागरिकांच्या हृदयाला भिडणारा ठरल्याचे सर्वत्र दिसून आले.

# माजी सैनिक प्रशांत कदम यांना 'इंडियन एक्सलेन्स स्टार अवार्ड

**कराड/प्रतिनिधी : -**

कराड तालुक्यातील माजी सैनिक व सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कदम यांना मुंबई येथे राज्यस्तरीय इंडियन एक्सलेन्स स्टार अवार्ड २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पंचरत्न मित्र मंडळ यांच्या वतीने १४ सप्टेंबर रोजी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी खासदार व आमदार ब्रिगेडियर सुधीर सावंत (नि.) व पार्श्वगायक श्री दादूस यांचे हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



श्री. कदम यांनी १९९१ ते २००७ या कालावधीत सैन्यात सेवा करताना जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान, ईशान्य भारत अशा संवेदनशील ठिकाणी कामगिरी बजावली. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी यशवंत चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना करून युवकांना सैन्य व पोलीस भरतीसाठी मार्गदर्शन, फिजिकल ट्रेनिंग, शैक्षणिक गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान व गरजूंना मदत अशी अनेक सामाजिक कार्ये सुरु ठेवली.

सैनिकांच्या समस्या, शहीद जवानांच्या कुटुंबीयांना न्याय, तसेच अमृत वीर जवान अभियान राबविण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. सातारा जिल्ह्यात सैनिक संपर्क अभियान, सैनिक कक्षाची स्थापना, तिरंगा रॅली, सैनिक सन्मान सोहळे असे विविध उपक्रम त्यांनी राबवले. यापूर्वी त्यांना सैनिक योद्धा, आदर्श सैनिक व प्रेरणा असे राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. सध्या ते सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असून, सैनिक व समाजकल्याणासाठी झटत आहेत.

# हजरत शाह शफिल यांच्या १२७ व्या ऊरूस निमित्त अक्कलकोट येथे खतना कॅम्प संपन्न

**अक्कलकोट/ प्रतिनिधी:-**

अक्कलकोट येथील सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान असलेले हजरत शाह शफिल यांच्या १२७ व्या ऊरूस निमित्त अक्कलकोट येथे खतना कॅम्प घेण्यात आले या खतना कॅम्प ला मोठा प्रतिसाद मिळाला.

अक्कलकोट येथील हजरत शाह शफील रह. कादरिया दर्गा यांचा १२७ व्या ऊर्स निमित्त शेरे ए हिंद हजरत टिपू सुलतान सोशल फाउंडेशन यांच्या वतीने मंगळवार दि.१६ सप्टेंबर रोजी खतना कॅम्प आयोजन करण्यात आले होते. या कॅम्प मध्ये ३५ बालकांची खतना करण्यात आली.



खतना कॅम्पला अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नन्नू कोरबू, माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, इरफान दावांना, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, रशीद खिस्तके, ज्योतिबा पारखे,अयाज चंदनवाले, बुडन तांबोळी आधी सह मान्यवरांनी खतना कॅम्पला भेट दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीशेरे ए हिंद हजरत टिपू सुलतान सोशल फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सैपन शेख, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास, बाबा गोलंदाज,शोएब यळसंगी, असलम रेड्डी, सोयल एमडी, शकील हवालदार, बबलू नाईकवाडी, नबीलाल शेख, मौलाली शिकलगार, सिराज जमादार बबु शेख आदीने परिश्रम घेतला.

# महाबळेश्वरात स्वच्छता पंधरवाड्याची उत्साहपूर्ण सुरुवात

**प्रतापगड/प्रतिनिधी:-**

केंद्र शासनाच्या 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरीषदेच्या वतीने स्वच्छता पंधरवाड्याची आज उत्साहपूर्ण सुरुवात करण्यात आली. दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत शहरात विविध स्वच्छता जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असून, यामधून नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव निर्माण करणे व स्वच्छतेचा व्यापक प्रचार करणे हे उद्दिष्ट आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ गिरीस्थान प्रशाला येथे करण्यात आला. या ठिकाणी विद्यार्थ्यांसह उपस्थित सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेतली. नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमाला वरिष्ठ लिपिक आबाजी ढोबळे, कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी अमित माने, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता प्रदीपकुमार बोरगे, संगणक अभियंता मंगेश माने, आरोग्य निरीक्षक प्रमोद कुंभार, स्थापत्य अभियंता मुरलीधर धायगुडे, वृक्षाधिकारी कल्याण हिवरे, लेखापाल ज्ञानेश्वर मोहिते, लेखापरीक्षक सचिन कदम, स्वच्छता मुकादम मनोज चव्हाण व अयुब वारुणकर, तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि हिलदारी प्रमुख राम भोसले व त्यांची टीम उपस्थित होती.

पंधरवड्याच्या काळात शहरात अनेक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महिलांसाठी कचरा वर्गीकरणाबाबत सामुदायिक बैठका, शालेय विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनविषयक जनजागृती सत्रे, 'रेड डॉट' बैठका, स्वच्छता अभियान, एकल वापर प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती कर्मचाऱ्यांची शासकीय योजनांमध्ये नोंदणी व त्यांचा सन्मान या सर्व उपक्रमांचा यात समावेश आहे.

# सांगलीत शुक्रवारपासून तीनदिवसीय फळ महोत्सव

**सांगली/प्रतिनिधी:-**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, कोल्हापूर व कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगली यांच्यावतीने उत्पादक ते ग्राहक थेट विक्री संकल्पनेतून तीन दिवसीय सांगली फळ महोत्सव-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. हा फळ महोत्सव दि. १९ ते २१ सप्टेंबर या कालावधीत होणार असून, या महोत्सवाचे उद्घाटन १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील स्मृतीभवन, मार्केट यार्ड, सांगली येथे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवास जास्तीत जास्त नागरिकांनी भेट देऊन फळांचा अस्वाद घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी केले आहे.

या फळ महोत्सवात सांगली जिल्ह्यातील ड्रॅगनफ्रुट, डाळिंब, पेरू, सीताफळ व इतर फळ उत्पादक शेतकऱ्यांना फळ विक्रीसाठी मोफत स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.


## अध्यासी अधिकारी,दि पाटण अर्बन को-ऑप. बँक लि. पाटण,ता.पाटण,जि.सातारा तथा उपनिबंधक,सहकारी संस्था,कराड ता.कराड जि.सातारा यांचे कार्यालय

**मार्केट यार्ड,गेट नं.५.भुखंड क्र. ३८८/८,मिलीटरी कॅन्टीन समोर,शनिवार पेठ,सातारा**

**फोन नं.०२१६४-२२२२३८** **मेल आयडी-karaddrcs@gmail.com**

## नोटीस

दि पाटण अर्बन को- ऑप. बँक लि. पाटण, ता. पाटण, जि. सातारा या बँकेच्या सर्व संचालकांना सुचित करण्यात येत की, आपल्या बँकेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण प्रवर्ग या मतदार संघातील दोन रिक्त संचालक पदांचे निवडीकरीता मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, सातारा यांचेकडील दि. १५.०९.२०२५ रोजीच्या आदेशास अनुसरुन अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक २४.०९.२०२५ रोजी सायंकाळी ४:०० वाजता बँकेचे कार्यालय दि पाटण अर्बन को ऑप. बँक लि. पाटण, ८८६ अ, मेन रोड पाटण, ता. पाटण, जि. सातारा या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत नैमित्तिकपणे रिक्त झालेली दोन पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

### निवडणूक कार्यक्रम

| अ. क्र. | तपशिल | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | सायंकाळी ४:०० ते सायंकाळी ४:३० |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | सायंकाळी ४:३१ ते सायंकाळी ४:४५ |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्दी | सायंकाळी ४:४५ |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | सायंकाळी ४:४६ ते सायंकाळी ५:०० |
| ५ | अंतीम उमेदवारांची यादी जाहीर करणे | सायंकाळी ५:०० |
| ६ | मतदान प्रक्रिया | सायंकाळी ५:०० ते सायंकाळी ५:३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | सायंकाळी ५:३१ ते सायंकाळी ५:४५ |
| ८ | निवडणून आलेल्या पदाधिका-यांबाबत निकाल घोषीत करणे. | सायंकाळी ६:०० |

**टिप:- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.**

**दि. १७.०९.२०२५**
**ठिकाण-कराड**

सही/-
(अपर्णा यादव)
अध्यासी अधिकारी, दि पाटण अर्बन को ऑप बँक लि. पाटण, ता. पाटण,
जि. सातारा तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड ता. कराड जि. सातारा



## जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे दुरुस्ती विधेयक २०२३ अन्वये में उपविभागीय दंडाधिकारी कराड उपविभाग कराड यांचे न्यायालयात

**एमएजी एस आर ५९/२०२५**

श्री.रघुनाथ रामचंद्र बागल
रा.मु.बोत्रेवाडी पो.जिंती
ता.कराड जि.सातारा — अर्जदार

**विरुध्द**

सरकार तर्फ
ग्रामविकास अधिकारी,तथा जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रामपंचायत आकाईचीवाडी ता.कराड जि.सातारा — जाबदार

ज्याअर्थी अर्जदार श्री. रघुनाथ रामचंद्र बागल रा. मु. बोत्रेवाडी पो. जिंती ता. कराड जि. सातारा यांनी अर्जामध्ये नमुद केलेली त्यांची मुलगी सुप्रिया रघुनाथ बागल यांचा जन्म दिनांक २१/१२/१९८९ रोजी मौजे आकाईचीवाडी ता. कराड जि. सातारा येथे राहत्या घरी झाला असुन जन्माची नोंद वरील कायदयाप्रमाणे ग्रामपंचायत आकाईचीवाडी ता. कराड जि. सातारा येथील जन्म मृत्यु रजिस्टरला व्हावी व त्याकामी में. कोर्टाने योग्य ते आदेश पारीत करावे म्हणुन अर्जदार यांनी मे. कोर्टात तसा अर्ज दिला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविणेत येते की. सुप्रिया रघुनाथ बागल रा. मु. बोत्रेवाडी पो. जिंती ता. कराड जि. सातारा यांचा जन्म दिनांक २१/१२/१९८९ रोजीचे जन्माची नोंद वरील कायदयाप्रमाणे ग्रामपंचायत आकाईचीवाडी ता. कराड जि. सातारा येथे होणेस कोणाची काहीएक हरकत अगर तक्रार असलेस संबधितानी या मे. न्यायालयात दि. ०१/१०/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, कराड येथे हजर राहुन आपले म्हणणे मांडावे अन्यया कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे समजुन पुढील योग्य ते हुकूम होतोल यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दिनांक १६/०९/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे.

**स्थळ : कराड**
**तारीख : १६/०९/२०२५**

सही/-
अतुल म्हेत्रे
उपविभागीय आधिकारी
कराड उपविभाग कराड



## कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,सातारा बांधकाम भवन,सदरबझार,सातारा ४१५००१

email-westsatara.eemahapwd.gov.in Phone: (02162)-234329

## ई-निविदा सूचना क्रमांक ४० सन २०२५-२०२६ (ऑनलाईन )

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, सातारा ४१५ ००१ (दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३४३२९) महाराष्ट्र शासनाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम खात्याकडून या विभागाच्या कार्यकक्षेतील खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. कामाच्या अंदाजपत्रकीय दरामध्ये GST समाविष्ठ नाही. कंत्राटदार यांनी त्यांचा देकार सुध्दा GST वगळुन (समाविष्ठ न करता) द्यावयाचा आहे. कंत्राटदार यांना GST देयकाच्या रकमेवर देय दराने स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत मरळी दौलतनगर परिसरातील शैक्षणिक संकुलासाठी पायाभुत सुविधा व शैक्षणिक साहित्य पुरवठा करणे. ता. पाटण जि. सातारा. | ९०.०० |
| २ | मौजे आनेवाडी येथे दिपाचा ओढयावर साकव बांधणे, ता. जावली, जि. सातारा | ५१.०० |
| ३ | मौजे तळबीड येथे साकव पुल बांधणे, ता. कराड, जि. सातारा | ७४.०० |
| ४ | मौजे आचली येथे सोळशी नदीवर साकव बांधणे, ता. महाबळेश्वर, जि. सातारा | ८०.०० |
| ५ | मौजे भोसे येथील ओढयावर साकव बांधणे ता. महाबळेश्वर, जि. सातारा | ७५.०० |
| ६ | मौजे गवडी आनंदवाडी येथील ओढयावर साकव बांधणे, ता. जावली, जि. सातारा | ५८.१९ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २२/०९/२०२५ ते दिनांक २९/०९/२०२५
ई-निविदा उघडणे :- दिनांक-३०/०९/२०२५ ते दिनांक ०१/१०/२०२५

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
2. http://mahapwd.gov.in
2. https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
३. कार्यकारी अभियंता, सा. बां. (पश्चिम) विभाग सातारा कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. लेखा/निविदा / ७०८७ / २०२५
कार्यकारी अभियंता, सा. बां. (पश्चिम) विभाग,
सातारा यांचे कार्यालय.
दिनांक : ०९.०९.२०२५

विमाका/पुणे/जाहि/ १४४/२०२५-२६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां.(पश्चिम) विभाग,सातारा**

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे गावागावांत विकासाची नवी दिशा

## आ.सुहास बाबर:आळसंद येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ;महिला प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग

**विटा/ प्रतिनिधी:–**

शुभारंभ प्रसंगी आमदार बाबर म्हणाले, ग्रामपंचायत ही लोकशाहीची पायाभूत संस्था आहे. गावाचा शाश्वत विकास साधायचा असेल तर योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि डिजिटल गव्हर्नन्स आवश्यक आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे गावागावांत विकासाची नवी दिशा मिळेल. या मोहिमेला प्रत्येक ग्रामस्थाचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन खानापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुहास अनिलभाऊ बाबर यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानच्या शुभारंभ कार्यक्रमात केले. त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत राबविण्यात येणार्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या उपक्रमाचा शुभारंभ बुधवारी आळसंद, ता. खानापूर येथे आमदार सुहास अनिलभाऊ बाबर यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे बैलगाडीतून पारंपरिक वाद्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. या वेळी तहसीलदार योगेश्वर टोपे, गटविकास अधिकारी संताजी



पाटील, जिल्हा कृषी अधिकारी संतोष वेताळ, विस्तार अधिकारी वसंत माळी, सरपंच अजित जाधव, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेत अधिकारी मंडळींनी शासकीय योजना, निधीचा प्रभावी वापर, पारदर्शक कारभार आणि डिजिटल पद्धतीने ग्रामपंचायतींचे कामकाज या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत राबविण्यात येणार्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा मुख्य उद्देश राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिकदृष्ट्या सशक्त बनवणे हा आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावांच्या सर्वांगीण विकासाला गती देत, शासकीय योजनांचा लाभ थेट ग्रामस्थांपर्यंत पोहोचवणे हे प्रमुख ध्येय आहे. ग्रामपंचायतींच्या कामकाजात पारदर्शकता आणणे, निधीचा काटेकोर आणि जबाबदार वापर करणे, तसेच डिजिटल गव्हर्नन्सला प्रोत्साहन देऊन ग्रामशासन अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख करणे यावर या उपक्रमाचा भर आहे.

### महिलांच्या प्रतिसादाचे आमदारांकडून कौतुक

कार्यक्रमात महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. ग्रामपंचायत स्तरावरील महिला प्रतिनिधींनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. महिलांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादाचे कौतुक करत आमदार बाबर म्हणाले, गावाच्या विकासात महिलांचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. स्वयंसहायता गट आणि महिलांची नेतृत्वक्षमता ग्रामीण भागाच्या प्रगतीला नवी दिशा देते. आज इतक्या मोठ्या संख्येने महिला उपस्थित राहिल्याबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.



# स्व.पी.डी.पाटील यांना मान्यवरांकडून आदरांजली

**कराड/प्रतिनिधी : –**

कराड तालुकाचे भाग्यविधाते, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक आदरणीय स्व.पी.डी. पाटीलसाहेब यांना १७ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त मान्यवरांनी आदरांजली वाहिली.

यावेळी पद्मभूषण बाबासाहेब कल्याणी, सौ. सुनिताताई कल्याणी, जेष्ठ गांधीवादी नेते माजी आमदार उल्हासदादा पवार, माजी आमदार आनंदराव पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनिल माने, तहसीलदार सौ. कल्पना ढवळे, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, सौ. संगिता साळुंखे, तानाजीराव साळुंखे, डॉ. अशोक गुजर, दिलीपराव चव्हाण, अॅड. मानसिंगराव पाटील, अल्ताफहुसेन मुल्ला आदींसह अजिंक्यतारा कारखान्याचे माजी चेअरमन रामभाऊ जगदाळे, माजी पं. स. सभापती देवराज पाटील, माजी अर्थ व शिक्षण सभापती मानसिंगराव जगदाळे, आदर्श सरपंच शहाजीराव क्षीरसागर, कराडचे माजी नगराध्यक्षा सौ. उमा हिंगमिरे व अॅड. विद्याराणी साळुंखे, जयवंत पाटील, रहिमतपूरचे माजी नगराध्यक्ष आनंदराव कोरे, विद्याधर बाजारे, प्रणव ताटे, सुहास बोराटे, जगदीश जगताप, दयानंद पाटील, हर्षवर्धन कदम, लहुराज जाधव, राजेश पाटील-वाठारकर, सौ. भाग्यश्री भाग्यवंत, डॉ. विजय साळुंखे, सौ. रेश्मा कोरे व सौ. शोभाताई पाटील, जगन्नाथ माने, अमोल सोनवणे, सर्व संस्थांचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी, तसेच विविध संस्थांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन व सर्व संचालक, सेवक उपस्थित होते.

# कराड व मलकापूर शहरात होणार नमो उद्यान

## आ.डॉ. अतुल भोसले यांच्या प्रयत्नांतून २ कोटींचा निधी मंजूर

**कराड/प्रतिनिधी : –**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात 'नमो उद्यान' उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेमध्ये भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.डॉ. अतुल भोसले यांच्या विशेष प्रयत्नांमुळे कराड व मलकापूर शहराचाही समावेश करण्यात आला असून, याठिकाणी 'नमो उद्यान' साकारण्यासाठी एकूण २ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

राज्यातील शहरी भागात हरित उद्यानांचे जाळे निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने 'नमो उद्यान योजना' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी तब्बल ३९४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात 'नमो उद्यान' साकारण्यासाठी नगरपालिकांना प्रत्येकी १ कोटींचा निधी वितरित केला जाणार आहे.



या योजनेत कराड आणि मलकापूर शहराचाही समावेश व्हावा, यासाठी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.डॉ. अतुलबाबा भोसले प्रयत्नशील होते. त्यांच्या या प्रयत्नांमुळे कराड आणि मलकापूर येथे नमो उद्यान साकारण्यासाठी प्रत्येकी १ कोटीप्रमाणे एकूण २ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

'नमो उद्यान' ही योजना केवळ हरित पट्टे उभारण्यापुरती मर्यादित नसून, ती शहरी जीवनमान सुधारण्याची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या उद्यानांमुळे नागरिकांना निरोगी व शुद्ध हवा मिळून त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार आहे. तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी आधुनिक साधने आणि तर युवक व महिला यांच्यासाठी व्यायाम साधनांची सुविधा उपलब्ध होणार आहेत. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅक व शांत विश्रांती स्थळेही निर्माण केली जाणार आहेत. या हरित उद्यानांमुळे शहरातील प्रदूषण कमी होण्यासही मदत होणार असून, शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

दरम्यान, या उद्यानांची उभारणी केल्यानंतर शासनाकडून या उद्यानांची राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिल्या ३ क्रमांकांसाठी नगरपालिकांना बक्षीस म्हणून अनुक्रमे ५ कोटी, ३ कोटी व २ कोटी रुपयांचे अतिरिक्त अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

> 'नमो योजनेअंतर्गत कराड व मलकापूरमध्ये लवकरच उद्याने उभारली जाणार असून, त्याचा लाभ नागरिकांना होणार आहे. तसेच कराड व मलकापूर शहराच्या सौंदर्यात भर पडण्यास मदत होणार आहे.
>
> – आ.डॉ. अतुल भोसले
> (सातारा जिल्हाध्यक्ष, भाजपा)

# शिवडेत सडलेला गहू व खराब तांदूळ बदलून नवीन पुरवठा

**उंब्रज/प्रतिनिधी:–**

कराड तालुक्यातील शिवडे येथे रेशनिंग दुकानात वितरित करण्यासाठी आलेल्या गहू व तांदळाच्या धान्याची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट आढळल्याने ग्रामस्थांत तीव्र नाराजी उसळली होती. सडलेला गहू व आळ्या झालेला तांदूळ पाहून नागरिकांनी संताप व्यक्त केला. याप्रकरणी पुरवठा विभागाने सुरुवातीला हात झटकले असले तरी ग्रामस्थांच्या दबावानंतर अखेर बुधवारी सायंकाळी शिवडे येथे नव्या गाडीने ताजे धान्य पाठवून दिले.

गेल्या आठवड्यात कराड तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये रेशनिंगचे गहू व तांदूळ वाटप झाले. पण या वाटपात मोठ्या प्रमाणावर धान्य सडलेले, कुजलेले व आळ्या पडलेले असल्याचे उघड झाले. आरोग्यावर गंभीर परिणाम करणारे असे धान्य नागरिकांच्या घरी पोहोचल्याने संतप्त वातावरण निर्माण झाले. ग्रामीण भागात रेशनिंग हेच बहुजनांचे मुख्य अन्नस्रोत असल्याने या धान्यामुळे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली.

शिवडे गावातील संदीप घाडगे यांनी सोमवारी कराड येथे पुरवठा विभागाच्या कार्यालयात प्रत्यक्षातच हे धान्य दाखवून जाब विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र यात आम्ही काय करू शकतो असा पवित्रा घेत अधिकाऱ्यांनी हात झटकले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये अन्याय झाल्याची भावना अधिकच तीव्र झाली. वहागावचे सरपंच संग्राम पवार यांनीही आपल्या गावात आलेल्या खराब धान्याबाबत नाराजी व्यक्त केली. अनेक गावांतील रेशनिंग ग्राहकांकडून तीव्र आक्रोश होत होता.

शिवडे, वहागावसह तालुक्यातील अनेक ठिकाणी खराब गहू व तांदळाचे वाटप झाल्याने पुरवठा विभागावर टीकेची झोड उठली. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये प्रश्न निर्माण झाला की रेशनिंग ग्राहकांनी न्याय मागायचा तरी कुणाकडे? दरम्यान झालेल्या तीव्र निषेधानंतर पुरवठा विभाग जागा झाला आणि शिवडे गावात आलेले धान्य ताब्यात घेऊन बुधवारी सायंकाळी ताजे धान्याची गाडी गावात आणली. स्वस्त धान्य दुकानात नवीन धान्य खाली करण्यात आले असून खराब धान्याची पोती परत घेण्यात आली आहेत. यावेळी पुरवठा विभागाचे अधिकारी व तलाठी उपस्थित होते.

सद्यस्थितीत नागरिकांना तीन महिन्यांतून एकदा धान्याचे वाटप केले जाते. त्यामुळे एकदाच मिळणाऱ्या या धान्याची गुणवत्ता चांगली असणे अपेक्षित असते. मात्र सडके धान्यामुळे लोकांच्या आरोग्याशी खेळ केला गेला, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे. पुरवठा विभागाने केवळ धान्य बदलून देऊन जबाबदारी संपली असे न मानता खराब धान्य पुरवणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

या प्रकरणामुळे रेशनिंग योजनेतील भ्रष्टाचार व निष्काळजीपणाचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे. सडलेले धान्य तालुक्यातील इतर गावांमध्येही वितरित झाले असून तिथेही बदल करून योग्य दर्जाचे धान्य उपलब्ध करून द्यावे, असा सूर उमटत आहे.

# प्रभाकर घार्गे यांच्या वाढदिवसानिमित्त आज पळशीत शेतकरी मेळावा

**वडूज/प्रतिनिधी : –**

जिल्हा मध्यवर्ती बँक व पडळच्या खटाव,माण तालुका ग्रो प्रोसेसिंग साखर कारखान्याच्यावतीने पळशी (ता. खटाव) येथे गुरूवार, दि. १८ दुपारी २ वाजता शेतकरी मेळावा व अभिष्टचिंतन सोहळा आयोजित केल्याची माहिती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे विभागीय विकास अधिकारी घनश्याम सावंत, कारखान्याचे मुख्य शेती अधिकारी किरण पवार यांनी दिली.

माजी आमदार प्रभाकर घार्गे यांच्या वाढदिवसानिमित्त मानाजीबाबा



विद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम होणार आहे. ऊस व इतर पिकांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर या मेळाव्यात मार्गदर्शन केले जाणार आहे. माजी आमदार प्रभाकर घार्गे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे.

जिल्हा बँकेचे अध्यक्ष, खासदार नितीन पाटील यांच्या हस्ते मेळाव्याचे उदघाटन होणार आहे. यावेळी पडळ कारखान्याचे को-चेअरमन, आमदार मनोज घोरपडे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, संचालक प्रदिप विधाते, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ व कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचे तंत्रज्ञ डॉ.विवेक भोईटे, व पुण्याच्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे पिक उत्पादन व संरक्षण विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.अशोक कडलग हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# साताऱ्यात बौध्द महासभेतर्फे जनआक्रोश मोर्चा

**सातारा/प्रतिसनिधी:–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, होश मे आओ..होम मे आओ, नितीश कुमार होश में आओ अशा घोषणा देत बौध्द गया येथील बौध्द विहार हे बौध्द बांधवांच्या ताब्यात देण्यात यावे, या मागणीसाठी दि बुध्दिष्ट सोसायटी ऑफ इंडिया भारतीय बौध्द महासभेतर्फे बुधवारी साताऱ्यात जनआक्रोश आंदोलन मोर्चा काढण्यात आला.

सातारा येथील शाहू चौकामधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसरात जिल्हाभरातील बौध्द बांधव सहभागी झाले होते. भारतीय बौध्द महासभा, समता सैनिक दल, भारतीय बौध्द महासभा यांनी या मोर्चाचे आयोजन केले होते.

जागतिक बौध्दांचे श्रध्दास्थान व जेथे भगवान बुध्दांना बुध्दत्व प्राप्त झाले. त्या बुध्दगयातील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे आद्य प्रणेते धम्मपाल यांच्या जयंती दिनानिमित्त व दि. बुध्स्टि सोसायटी ऑफ इंडियाचे द्वितीय राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त व महाबोधी महाविहार बोधगया मुक्ती, महू जन्मभूमी आणि नागरपूर दीक्षा भूमीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली या मोर्चाचे सर्वत्र आयोजन करण्यात आले होते. या मोर्चामध्ये शेकडो बौध्द बांधव सहभागी झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला अभिवादन करुन मोर्चाला सुरुवात झाली.



भारतीय बौध्द महासभेतर्फे काढण्यात आलेला मोर्चा.

जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा नेण्यात आला.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समितीचे चंद्रकांत खंडाईत, गणेश कारंडे, रिपाईच्या आठवले गटाचे अशोकराव गायकवाड, पार्थ पोळके, गुणरत्न मावळा, संदीप जाधव, आदित्य गायकवाड, गौतम भोसले, अनील वीर, विशाल भोसले आदी उपस्थित होते.

# पूरग्रस्त भागाची पालकमंत्र्यांनी केली पाहणी

**सोलापूर/प्रतिनिधी:–**

जिल्ह्याच्या करमाळा तालुक्यात १४ सप्टेंबर रोजी ९ महसुली मंडळात अतिवृष्टी झाली. तसेच सीना नदीला पूर येऊन खडकी, निलज, बोरगाव, तरटगाव, बिटरगाव (श्री), वाघाचीवाडी, आळजापुर, बाळेवाडी आदी गावात पुराचे पाणी शिरल्याने शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खडकी व बिटरगाव श्री या गावातील पूरग्रस्त भागाची पाहणी प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली. तसेच झालेल्या नुकसानीचे पंचनामे प्रशासनाने त्वरित करून शासनाला अहवाल सादर करावा, असे आदेशही त्यांनी दिले.

यावेळी पालकमंत्री श्री. गोरे यांनी खडकी येथे पुराच्या पाण्याच्या प्रवाहाने फुटलेल्या बंधाऱ्याची पाहणी करून येथील नुकसानग्रस्त शेतकरी श्री. लोहार यांच्याकडून झालेल्या नुकसानीची माहिती घेतली.














# मिनाताई ठाकरेंच्या पुतळ्यावर रंग..

पान १ वरून

झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर शिवसेनेकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. तर, दोन्ही ठाकरे बंधूंनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली होती.

शिवाजी पार्क येथे उभारलेल्या स्व. मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याजवळ लाल रंग टाकण्याचा प्रयत्न झाल्याने राज्यभरात खळबळ उडाली होती. मुंबईत विविध जिल्ह्यात शिवसैनिकांनी तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या. तर, राजकीय नेत्यांनीही आपली प्रतिक्रिया देत आरोपीच्या अटकेची मागणी केली होती. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही पुतळास्थळाची पाहणी करत २४ तासांत आरोपीला बेड्या ठोका असे म्हटले होते. तर, उद्धव ठाकरे यांनीही पाहणी करत पोलिसांना सूचना केल्या होत्या. तसेच, सदर प्रकार दोन प्रकारच्या व्यक्ती करु शकतात. त्यामधील पहिलं म्हणजे स्वतःच्या आई-वडिलांचं नाव घ्यायला शरम-लाज वाटणाऱ्या लावारिस लोकांनी हे कृत्य केलं असेल, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं होतं. तसेच दुसरं म्हणजे बिहारमध्ये ज्याप्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आईचा अपमान झाला, म्हणून बिहार बंद करण्याचा एक असफल प्रयत्न केला गेला. त्याप्रमाणेच हा सर्व प्रकार करुन महाराष्ट्र पेटवण्याचा उद्देश असू शकतो, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले होते.

पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपीने जबाबात धक्कादायक माहिती दिली आहे. संपत्तीच्या वादात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे हस्तक्षेप करत असल्याचा आरोप आरोपीने केला आहे. दादर पोलीस ठाण्यात श्रीधर पावसकर आणि आदित्य ठाकरे यांच्याविरोधात तक्रार देण्यासाठी सातत्याने यायचा, अशी सूत्रांची माहिती आहे. आता, आरोपीचा जबाब नोंदवल्यानंतर पोलिस अधिक तपास करीत आहेत.